# प्रकरण तिसरे

## झोपडपट्टी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा

# प्रकरण तिसरे

## झोपडपट्टी जीवनाचे चित्रण करणा-या कथा.

बाबुराव बागुलांनी आपल्या दलित साहित्याविषयी मांडलेल्या भूमिकेतील विचारांच्या अनुषंगाने त्यांच्या झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण करणा-या कथांचे आकलन आणि मूल्यमापन करणाचा प्रस्तुत प्रकरणात प्रयत्न करावयाचा आहे.

बाबुराव बागूल माणसाच्या दु:खाला १) सामाजिक विषमता/ अस्पृश्यता आणि २) दारिद्र्य/ आर्थिक शोषण व ३) मानवी स्वभाव ही कारणे आहेत असे चित्रित करतात. हीच विभागणी दुस-या पध्दतीने मांडावयाची झाली तर असे म्हणता येईल की, बागूलांची पात्रे तीन पातळ्या-वरुन दु:ख अनुभवीत असतात.

१) माणूस विरुध्द सामाजिक विषमता आणि २) माणूस विरुध्द आर्थिक विषमता व ३) माणूस विरुध्द माणूस अथवा मनुष्यस्वभाव

### दु:खाचे कारण : सामाजिक विषमता.

झोपडपट्टीत राहणारी ही माणसे कवडी मोलाची आहेत. त्यांना नगराने बहिष्कृत केल्याने स्वत:च्या मालकीची जागा नाही. जिथे जागा मिळेल तिथे ते राहतात. मोकळे मैदान, स्मशान, गटारीच्या शेजारी, इमारतीचा आडोसा ही त्यांची वास्तव्याची ठिकाणे. ही माणसे दरिद्री असल्याने जगण्याएवढाही त्यांच्याजवळ पैसा नाही. तरीपण चिवटपणाने ते जगतात. अशा त-हेने हीनदीन जीणे जगणा-या माणसांना सामाजिक विष-मते मुळे दु:खात रहावे लागते. या दु:खाला हिंदूधर्मनिर्मित वर्णव्यवस्था, जातीभेद जातीभेदातून निर्माण झालेला उचनीच हा भेद कारणीभूत असतो. दलित म्हणून जन्मल्यामुळे उच्चवर्णीयापासून तो बाजूला पडतो. आणि या दलिताला उच्चवर्णीयाकडून सामाजिक विषमतेचे चटके बसू लागतात. त त्याच्यावर होणा-या अन्यायामुळे तो दु:खाच्या नरकयातना भोगतो. हे दु:ख बागूलांनी आपल्या 'विद्रोह', 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि

'कवितेचा जन्म' या झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण करणा-या कथांतून व्यक्त केले आहे.

अस्पृश्यतेने ज्याची स्वप्ने चक्काचूर होतात, जाति व्यवस्थेच्या बंधनाने ज्याचा तडफडाट होतो, ज्यांच्या विद्वत्तेचा अपमान होतो, असा अस्पृश्यते विरूध्द बंड करणारा नायक 'विद्रोह' या कथेत बागूल चितारतात. समाज, धर्म, देश याविरूध्दच्या प्रक्षोभाने विद्रोही भावनेचा स्फोट ही कथा करते.

विषमतेचे विषारी झाड लावणारा मनूच कथानायक जय च्या असंतोषाला कारणीभूत झाला आहे. उपमानित जिणे जगण्याचे सोडून संघर्ष केल्याशिवाय उन्नती नाही, हे समजूनच बागुलाचा नायक विद्रोह पुकरतो. आणि दलिताच झुगारायला सिध्द होतो. स्वातंत्र्यानंतरही होणा-या दलितांच्या शोषणाविरूध्द बागुलांची कथा आवाज उठविते. मनुमताऐवजी माणसाच्या महत्तेची पूजा त्यांनी या कथेद्वारे आरंभला आहे.

शिक्षणाने अस्मिता जागा झालेला, पण भंग्याच्या घरात जन्मलेल्या जय च्या घरी अठराविश्वे दारिद्र होते. वडील आजारी. आई म्युनिसि-पालिटीत नोकरीला. उत्पन्न अपुरे, खाणारी तोंडे चार. आजारी बापाला वाचविण्यासाठी, पत्नीचा स्वीकार करण्यासाठी त्याने भंग्याची नोकरी स्वीकारावी म्हणून त्याची आई भानी, वडील आणि समाजातील लोक त्याला वारंवार सांगतात पण हे काम आपणाला धर्म, संस्कृती आणि देश यामुळे करावे लागते म्हणून त्यांच्यावर जय चिडतो, त्याच्या मनात या सर्वा-विरूध्द विद्रोहाची भावना निर्माण होते. माणसाला जनावरापेक्षा हीन लेखणा-या धर्माने, दरिद्राने सांगितले म्हणून भंग्याची नोकरी करायला जय तयार होत नाही. बागुलांच्या भूमिकेचा उच्चार करणारा हा तेजस्वी नायक वडिलांना उत्तर देताना म्हणतो :

'कोणता धर्म ? ज्याने माणसाला मोडून टाकले, पशु लेखले, त्या धर्माने ? माणसालापेक्षा दगडाला महत्त्व देतो त्या देशाने ? त्याचे ऐकायास मी तयार नाही'[१] या जयच्या उद्गारातून दुःखाचे मूळ येथील धर्म आणि देशातील सामाजिक परिस्थितीत आहे, हे जसे समजते तसेच बागुलांच्या माणसाच्या महत्तेच्या पुरस्काराचेही दर्शन घडते.

अस्पृश्यांच्या दुःखाचा जन्म भारतातील धर्म-संस्कृतीमधूनच होतो, म्हणून त्याविरुद्धचा उसळता संताप व्यक्त करताना तो म्हणतो, 'कसली ही संस्कृती ? जिथे मुलगा जन्मदात्या आईस ती भंगीकाम करते म्हणून तुच्छ लेखतो! तिचा द्वेष करतो. तिच्या हाताचे अन्न खायला किळसतो. ह्या संस्कृतीने अस्पृश्यता निर्माण केली नसती तर मी स्वतःच्या मातेला प्रचंड पीडा देणारा दैत्य झालो नसतो.'[२] या त्याच्या संतापयुक्त उद्गारातून हिंदू संस्कृतीला तो नकार देतो हे दिसून येते.

मैला वाहून नेणाऱ्या गाडीवानाचे आणि जयचे भांडण लागल्यावर त्यांचा विटाळ होऊ नये, अंगाला घाण लागू नये म्हणून जनावराची चाकरी करणारे भैय्ये भंग्यांना स्पर्श करीत नाहीत हे दृष्य मानवतेला काळोख लावणारे आहे.

जयच्या अंतरीची खळबळ समर्थपणे बागुलांनी या कथेत चित्रित केले आहे. अस्पृश्यांच्या दुःखाला कारणीभूत असणाऱ्या धर्म, संस्कृती यावर त्यांनी अमानुषपणे हल्ला केला आहे. आणि या सर्वांचे चित्रण करताना त्यांची लेखणी अंतरीच्या आगीने संहारक अस्त्रासारखी माणसांचे काळीज चिरत जाते.

उच्चनीचतेने आणि सामाजिक विषमतेने ज्यांना दुःसह यातना भोगाव्या लागतात अशा दलितांचे जीवनदर्शन 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथेव्दारे बागूल घडवितात. अस्पृश्यांचे जगणे हे एका अर्थाने क्षणाक्षणाला मरणेच असते. अस्पृश्यतेमुळे मिळणाऱ्या अनंतर यातनांची टोचणी या कथेत व्यक्त केली आहे. चातुर्वण्याने निर्मिलेल्या जातीच्या चौकटी उध्वस्त करून समाज समानतेच्या पातळीवर आणायला आहे, माणसाला प्रतिष्ठा द्यावयाची आहे अशी जाणिव या कथेद्वारे बागूल सुचित करतात.

नोकरी करण्यासाठी परगावी गेलेल्या अस्पृश्य तरुणाला राहण्यासाठी जागा मिळावी म्हणून जात लपवून ठेवावी लागते. तेव्हा तरुण बुद्धीमान, ज्ञानी आणि कविप्रवृत्तीचा आहे. अनेक भाषांचे त्याला ज्ञान आहे आणि दिसायलाही नीटनेटका असल्यामुळे रणछोडदास त्याला आपल्या घरी राहायला जागा देतो. रामचरण त्याच्या विद्वत्तेने; कवित्वाने भारावून जातो, त्याच्या हिंदी बोलण्याने मातापुसाद प्रभावित होतो. रामचरण त्याला गुरु मानतो व घरी नेऊन पत्नीकडून औंवोळ घालून जेवायला भाग पाडतो. पण ज्यावेळी त्याची जात माहिती होते, त्यावेळी त्याला सन्मान देणारे, आत्मीयता दाखविणारे मारयला सरसावतात. एका विद्वानाची, कवीची श्रेष्ठता त्याची जात समजल्याबरोबर नाहीशी होऊन सर्वजण त्याला अन्य काहीही कारण नसताना, हलक्या जातीचा आहे म्हणून चिडून मारहाण करतात, त्याची सर्टिफिकेटे फाडतात. आणि त्याच्याच जातीचा काशीनाथ ज्यावेळी त्यांना म्हणतो ,'तुम्ही मुर्खांचा मार सहन तरी केला कसा ?' त्यावेळी तो तरुण उत्तरतो, " त्यांचा मार मी कुठे खाला ? मनूने मला मारले![३] त्याच्या या उद्गारातून हिंदूधर्माचे प्रशासन करणा-या मनु-स्मृतीनेच निर्माण केलेल्या समाजव्यवस्थेमुळेच उच्चवर्णीय नीच लोकांना त्रास देत होते ही खंत दिसून येते.

आर्थिक दुरवस्थेमुळे कामगाराला मरणप्राय यातना सहन कराव्या लागतात म्हणून काशीनाथ हा कामगाराचे जीणे नाकारतो. काशीनाथ आणि त्या तरुणाला अस्पृश्य म्हणून जे दु:ख भोगावे लागते त्याचे उगमस्थान सामाजिक विषमतेत आहे याचे चित्रण बागुलांनी या कथेत नाटयत्मक पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला आहे.

झोपडपट्टीतील जीवनामुळे कलावंताच्या आत्म्याला कसा क्लेश होतो. दारिद्र्यामुळे झोपडपट्टीत राहणा-या कविमनाच्या मास्तरच्या मनात तगमग '<u>कवितेचा जन्म</u>' या कथेत बागूल चित्रित करतात. दु:ख, दैन्य, सामाजिक विषमतेमुळे मास्तरांच्या जीवनात वेदनेचा मळा पिंपला जात होता.

मास्तराच्या विचारातील आग आत्म्याचा मोठेपणा झोपडपट्टीत राहणाऱ्या क्षुद्र विचाराच्या आईला, बायकोला व समाजाला कशी समजत नाही याचे विदारक चित्रण बागूल या कथेत करतात.

हिंदूधर्मव्यवस्थेने निर्माण केलेल्या चौकटीमुळेच आपल्यावर अस्पृश्यता आदली व त्यामुळेच आपणाला असे हीन जीणे जगावे लागते आहे याची खंत मास्तरला आहे.

बहुतेक वेळेला बागुलांचे नायक बागुलांच्या भूमिकांची मांडणी करतात, समर्थन करतात असेच त्यांच्या कथातून जाणवते. बागुलांचे ज्ञानी, बुध्दिमान, भावनाशील नायक म्हणजे कथामध्ये पडलेल्या त्यांच्या आत्म्यातील विचार-भावनांचे प्रतिबिंबच असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

## दु:खाचे कारण: आर्थिक शोषण / दरिद्र्य.

झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांना दारिद्र्याचे भयानक चटके बसतात. या दरिद्र्यामुळेच जीवन जगण्यासाठी एकवेळचे अन्न मिळविणेसुध्दा त्यांना कठिण होते. भूक भागविण्यासाठी त्यांना देह विकावा लागतो. मरण पत्करावे लागते, मारामाऱ्या कराव्या लागतात. आर्थिक शोषणाने आलेल्या दारिद्र्यामुळेच या सर्व घटना घडत असतात. सामान्यत: खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींतील माणसेच दारिद्र्य भोगीत झोपडपट्टीत राहतात. समृध्द शहराच्या बाहेर आर्थिक हालाखीने जीवन जगणाऱ्या लोकांच्या दारिद्र्यानेच त्यांची जीवने बरबाद झालेली असतात. जीव गुदमरविण्याऱ्या घावीत, असांस्कृतिक वातावरणात राहण्याची शिक्षा दारिद्र्यानेच त्यांना दिली आहे, याची जाण बागुलाच्या झोपडपट्टी जीवनावरील कथा वाचताना झाल्याशिवाय राहात नाही.

वेश्या असूनही मातृत्वाची कोवळी भावना जपणाऱ्या गिरीजाच्या नशीबी असहाय्यता आणि दु:ख या शिवाय काहीच मिळत नाही याचे चित्रण " <u>वाटेवरची</u> " या कथेमध्ये बागुलांनी केले आहे.

गावाकडील लहान मुलाच्या प्रतिपाळासाठी गिरजा वेश्याव्यावसाय करीत होती. मुलावरील ममतेमुळे देहविक्रय करायचा ठरवूनही तिच्यापेक्षा सुंदर असणा-या वेश्यामुळे तिच्याकडे गि-हाइक येत नाही. हॉटेलवाल्या-कडून मुलगा आजारी असल्याचे समजताच तिचे मातृत्व उफाळून येते, पण मुलाकडे जाण्याएवढेही पैसे न मिळाल्याने ती गाता दु:खी होते. मनात दु:खाचा समुद्र उसळलेला असला तरी पैसा मिळवण्यासाठी धंदा करायचा असल्यामुळे तिला मनसोक्त अश्रूसुध्दा ढाळता येत नव्हते. नियतीची केवढी ही क्रूर चेष्टा. मुलाच्या प्रेमाने अंतरी दु:खी होऊन, पण चेह-यावर त्यांची पुसटशीही भावना न आणता धंधाला उभ्या राहिलेल्या मातेकडे कुणीही येत नाही. आपल्याकडे न येणा-या गि-हाइकावर ती मनोमन चिडते. भूक लागलेली असूनही पैसे मिळावेत म्हणून गि-हाईक शोधीत असताना चष्मेवाल्याबरोबर तिचा सौदा पटतो. पैसे देऊन तिच्या अंगावरचे एकेक वस्त्र उतरवून डोक्यात येईल तसा तो तिला त्रास देऊ लागतो. आणि त्रास होत असतानाही पैस्याच्या अभिलाषेने त्याची विकृती पूर्ण करण्या-करिता ती देहाचा मक्ता देते. या श्रमाने ती गलितगात्र होते आणि शुध्दीवर आल्यावर पैसे घेऊन पळून जाणा-या चष्मेवाल्याबरोबर भांडण करताना ती रक्ताळते, मार खाते आणि मरते. पण ज्या मुलासाठी तिने हा सर्व खटाटोप केला होता, तोही वारलाच होता, आजारी नव्हता.

दारिद्र्याने माणसांच्या कोमल भावनांचाही कसा चुराडा होतो ते या कथेत दाखविले आहे.

दारिद्र्यामुळे माणसाच्या ठिकाणचा नैसर्गिक चांगुलपणा कमी होतो, त्याच्या स्वभावात दुष्टपणा कसा येतो याचे चित्रण 'स्पर्धा' या कथेत बागुंलांनी केलेले आहे.

गावाकडील आपल्या मुलाच्या दारिद्र्याने फाटलेल्या संसाराला मदतीचे टाके घालण्यासाठी आणि पोट भरण्यासाठी केळे विकणारी जमना म्हातारी आणि नव-याचा आजार बरा करण्यासाठी, वेश्येगत वागून,

केळी विकून भरपूर पैसे मिळविणारी चंद्रा या दोघीत ही स्पर्धा आहे.

जमना आणि चंद्रा या दोघीही बरंदाज मराठ्यांच्या घरतल्या पण प्राप्त दु:सह दरिद्री परिस्थितीने शहरात येवून केळी विकून पैसे मिळवित होत्या. आणि भरपूर पैसे मिळविण्यासाठी कोणत्याही पायरीला जात होत्या. जातीची श्रेष्ठता दरिद्र्यामुळे त्या विसरल्या. आणि म्हणूनच दोघीमध्ये एकमेकींना धंधाच्या ठिकाणावरुन हाकलून देण्याची स्पर्धा लागली. या स्पर्धेत त्यांचे दिवसेंदिवस अध:पतन होत होते. त्या एकमेकी-बरोबर भांडत होत्या. शिवीगाळ करीत होत्या. स्वार्थाने अविचारी झालेल्या या स्त्रियांच्या मनात माणुसकी जागी असल्याचे दर्शन या कथेत होते म्हणूनच चंद्रा म्हातारीला त्रास दिल्यावर मनात पश्चाताप व्यक्त करते तर नव-यासाठी देहाची भूक मारुन रात्रदिवस कष्ट करणा-या चंद्रा-साठी म्हातारी गावी जायचे ठरवते.

चंद्रावर जीव टाकणारा किसन, तिच्या प्राप्तीसाठी वाटेल ते करायला तयार होता आणि चंद्राच्याही मनात अतृप्त भावना उसळत असली तरी ती मर्यादेने वागते. दारिद्र्यातही माणसे आपल्या जातीचे श्रेष्ठत्व विसरत नाहीत हा एक गुंता या कथेत किसनाला चंद्राने जात विचारल्यावर-च्या प्रसंगावरुन दिसून येतो.

डॅनीयच्या बालसुलभ भावनांचे, फर्नांडिस सह इतर साथीदारांच्या मनातील विचार, विकारांचे सूक्ष्मचित्रण सक्तमजुरी या कथेत केले आहे. माणसामध्ये उपजत असलेला चांगुलपणा आणि दारिद्र्याने आलेला क्रूरपणा यांच्यातील संघर्ष या कथेत पहावयास मिळतो.

तीन पत्ती जुगार खेळवून त्याद्वारे पैसे मिळवून संसाराला मदत करणारी फर्नांडिसची सात जणांची टोळी दारिद्र्याने गांजली आहे. गि-हा-ईक मिळावे म्हणून हरत-हेची नाटके करतात, पण गि-हाईक येत नाही. उपाशी पोटाने धंदा करुन पैसे मिळविण्याचा प्रयत्न करणारी ही सर्व माणसे आपापल्या भूतकाळातील दु:ख, दैन्याने ग्रासलेलीच आहेत. गि-हाईक मिळत नसल्याचा राग एकमेकावर काढतात. भांडण करतात आणि याचवेळी पोलीस येवून, त्यांना मारहाण करुन जबर व्याजाने आणलेले पैसे घेऊन जातात.

भुकेने कासावीस झालेला फर्नांडिसचा कोवळा मुलगा पोलीसावर पहारा देण्यासाठी उन्हात उभा राहून दारिद्र्याची सक्तमजुरी भोगत होता. त्याच्या वयातील इतर मुलांप्रमाणे त्याला खेळता येत नव्हते, भूक लागूनही खायला मिळत नव्हते याचे कारण त्याच्या घरातील दारिद्र्य. पतंगाकडे बघण्यात खेळण्यासाठी आसूसलेले त्याचे मन रमते आणि त्यामुळेच तो पोलिसांच्या आगमनाची पूर्वसूचना देऊ शकत नाही.

फर्नांडिसच्या इतर साथीदाराचे आयुष्य म्हणजे दु:खाचा पंचनामाच होता. ही सर्व माणसे दारिद्र्यात जीवन रखडण्याची कठोर सक्तमजुरीची शिक्षा भोगत होते.

झोपडपट्टीत राहणाऱ्या पालापाचोळ्याप्रमाणे जीवन जगणाऱ्या किळसवाणे, ओंगळ जीवन जगणाऱ्या माणसाच्या जीवनाकडे 'मरण स्वस्त होत आहे' या कथेने लक्ष वेधले आहे.

या कथेतील पात्राच्या जीवनातील दु:खाचा ज्वालामुखी वास्तव भिषणतेचा स्फोट करणारा आहे. ही सर्व माणसे दारिद्र्यामुळेच चक्रावून सोडणारे जीवन जगत आहेत. भीमू कदम, राणू नागवेकर, बारकू, चाचा, छंदेवाली पोगी, कच्छकडील झाडूवाली, मद्राशी केवा मणीवाली या सर्वांच्या जीवनात दु:खाने उच्छाद मांडला होता. दारिद्र्याचे तुफान त्यांच्या जीवनर्नौका डगमगवीत होते.

ही कथा अनेक पुष्पांनी निर्माण केलेल्या पुष्पमालेसारखी आहे. प्रत्येक पुष्प स्वतंत्र असले तरी सर्व पुष्पांचा एकत्रित अनुभव जसा पुष्पमालेतून येतो, तसेच या कथेत अनेक व्यक्तींच्या जीवनाचा स्वतंत्र आलेख रेखाटला तरी अस्वस्थता आणि जीवनाचा फोलपणा यांचा एकत्र संस्कार मनावर होतो. समाजाने बहिष्कृत केलेली, केरकचऱ्यासाठी कुठेही, कसेही बेफीकीरपणे जीवन जगणारी ही माणसे आहेत. दु:खाने ग्रस्त झालेली, वेदनेने गांजलेली ही माणसे प्रतिकूल परिस्थितीलाही जीवनावर श्रद्धा ठेवणारी आहेत.

कथाकर आणि कवी नवनिर्मितीच्या सृजनासाठी पृथ्वीवरच्या नरकात, समाजाचा गाळ असलेल्या झोपडपट्टीत फिरायला जातात. फिरताना त्यांना विविध त-हेच्या व्यक्ती आणि त्यांचे दु:ख, दैन्य दिसते. स्त्रीत्वाचा तिरस्कार करणारा, पेहेलवान असणारा, ज्याने जीवन उध्वस्त झाले आहे असा भिमू कदम हा मराठा गडी अतल्या दु:खी भूतकाळासह भेटतो. पूर्वजांनी दिलेले दारिद्र्य नाहीसे करून पहेलवानकी-मध्ये कुळाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी धडपडत असतात, त्याची बायको शत्रूपक्षातील माणसाबरोबर लागू झाल्यावर तिचा व त्याचा खून करून भिमू तुरुंगात जातो. शिक्षा भोगून आल्यावर मनातील विष्णणता घाल-विण्यासाठी दारु पिऊ लागतो. पोटाच्या खालच्या आणि वरच्या भूकेसाठी कच्छकडील झाडूवालीला तो जवळ करतो. मानसिक असंतुलनामुळे नोकरीतही तो कुठे टिकत नाही. त्याच्या झाडूवाल्या बायकोने व्यभिचार केला तरी त्याला काहीच वाटत नव्हते कारण निराश मनाने सुन्नपणे तो जीवन जगत असतो.

क्षयग्रस्त राणू नागवेकर बायका मुलांना पोसण्यासाठी बुटपॉलीस करताना कुणाचेही पाय धरतो. पुर्वायुष्यामध्ये प्रिंटरची, कमी पगाराची नोकरी करणारा राणू, आईच्या मृत्यूनंतर कर्जाच्या डोंगराखाली दबतो. त्यासाठी खोली विकून झोपडपट्टीच्या आश्रयाला येतो. कोणत्याही आणि कशाही पध्दतीने कुटूंबाचे पोषण करणे एवढेच त्याला माहिती असते. म्हणून तो सोंग करूनही पैसे कमवित असतो.

हैद्राबाद संस्थानमध्ये शिक्षकाची नोकरी करणारा चाचा मुंबईला मुलीकडे येतो. पण त्याची मुले बेकार होती. तिस-या मुलाच्या पोरबा-ळांना पोसण्यासाठी खोली उदसिपणे जीवन जगत जगतो.

ईर्षेसाठी माणसाचे किती अध:पतन होते ते बारकूच्या आयुष्यावरून समजते. पाणाड्याचे काम करणा-या बारकूचे पाय गेल्यामुळे जागेवरच तो सर्व विधी आटपू लागल्याने बारकूला भावाने घराबाहेर काढाले. भावावर मात करण्यासाठी बायको मुलासह मुंबईला आला. पैस्याच्या लालसेने अधम बनलेला बारकू बायकोला भिकारी, मुलाला ब्राम्हण भिक्षेकरी तर मुलीला वेश्या बनवतो. पैस्याच्या लोभाने पोटच्या मुलालाही विकतो. आणि

चौथ्या मुलीवर जबरी संभोग करण्यासाठी, पैस्याला हापापलेल्या बारकूचा खून होतो.

आई वाऱ्यावर सोडून गेल्यावर पोटाची भूक भागविण्यासाठी ती लहान वयाची पोर धंद्याला लागून नासते, तर काही गुंड नवऱ्याजवळ झोपलेल्या स्त्रीवर बलात्कार करु पाहतात.

असे हे मनाला सुन्न करणारे, झपाटणारे जग, जीवन बागुलांनी या कथेत चितारले आहे. नरेश कवडी म्हणतात, बागुलांच्या कथा वाचताना मरण स्वस्त होत आहे असा ठसा मनात प्रामुख्याने उमटण्याऐवजी जीवन भार चिवट आहे असाच ठसा उमटतो. बागूलांच्या कथाविश्वासत सर्वत्र मृत्युचे तांडव दिसते. लाक्षणिक अर्थाने ही सर्व पात्रे क्षणोक्षणी मरणारीही आहेत हेही खरे.[४] हे नरेश कवडी यांचे विधान यथार्थ वाटते.

निसर्गापासून संरक्षण मिळविताना माणसांचे मूलभूत विकार किती विविध रुपे धारण करुन प्रकट होतात याचे सुन्न करणारे चित्रण 'मैदानातील माणसे' या कथेत बागूल करतात. पशूप्रमाणे जीवन जगणाऱ्या दयनीय व्यक्ती-चित्रणातून दारिद्र्याचा, अमानुषतेचा तरीही सश्रद्ध जीवनाचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न या कथेत दिसतो. राहण्यासाठी झोपडपट्टीसुद्धा जागा नाही अशा माणसांची एका जीवघेण्या थंडीच्या दिवसातील रात्री कशी ससेहोलपट होते ते या कथेत दिसते. दारिद्र्यात असह्य जिणे जगणारी माणसे थंडीच्या तीव्र तडाख्याने एकेमेकांचा कसा द्वेष करतात, स्वत: जगण्यासाठी इतरांना कसे मारता याचे द्विारक चित्रण या कथेत आले आहे. थंडीमुळे हिंसक बनलेल्या माणसांच्या कथाच बागूल इथे सांगतात. शक्तीमान, गुंड पण दयाळू डेव्हिड-दादा, रक्तविकून भूक भागविणारा क्षयी अब्दल करीत, उकीरड्यावरील वस्तू शोधून पोट भरणारे एकमेकावर जीवापाड प्रेम करणारे धुणकाड आणि सुपड हे वृद्ध जोडपे, कागद वेचून जीवन जगणारा रामू, कुत्र्याच्या पिलाला आपली गोंडस पत्नी समजणारा [illegible] मद्राशी महारोगी, ऊब मिळविण्यासाठी एकमेकांना आवळून धरणारी फासेपारध्याच्या टोळीतील आजाआजी, थंडी-पासून बचाव करण्यासाठी मैथून करणारी तरुण जोडपी, कामज्वराने अस्वस्थ

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

झालेली कुवार सोना आणि झुडपाआड बाळंत होणारी भिका-याची स्त्री; ही सर्व पात्रे आपल्या पूर्वायुष्यासह वाचकासमोर येतात. या कथेला चित्रगॅलरीचेच स्वरूप प्राप्त होते. आणि दरिद्री असणा-या या सर्वच माणसांचे आयुष्यावर प्रेम असल्यामुळे थंडीपासून विविध मार्गाने संरक्षण मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. एरवी दुबळी असणारी माणसे जीवनावरील प्रेमामुळे प्रतिकार करतात, अमानुष वर्तन करतात, माणुसकी विसरतात याचे चित्रण या कथेत आहे. ही माणसे जीवन जगण्यासाठी पशूच्या पातळीवर येतात. त्याचे मूळ त्यांच्या भयंकर दरिद्र्यात आहे हा ठसा या कथेने वाचकाच्या मनावर उमटतो.

'लुटालूट' या कथेत दारिद्र्यामुळे देह विकून पोट भरणा-या स्त्रियांचे शोषण समाजातील माणसे कसे करतात, त्यांची लूट कशी करतात हे बागूलांनी चितारले आहे.

गंगू ही नायकीण भावाला पैसे देण्याकरिता पोरींना धंद्याला जायला सांगत असतानाच, वंचाळा तिला विरोध करून बाहेर निघून जाते. भावावरील प्रेमामुळे गंगू सोनी, पुतळीला धंद्याला उभी करते पण गि-हाईक येत नाही. शेवटी एक माणूस सोनीला घेऊन गेल्यावर बाकीचे दोघे वाट बघत असतानाच बाहेरून आलेल्या वंचाळाशी लगट करण्याचा प्रयत्न करतात. आणि दुःखाने व्यथित झालेली वंचाळी त्यांना मरते. व त्यामुळेच गंगू आणि वंचाळाचे भांडण होऊन, गर्दी जमा होते. सिद्राप्पादादा, भैया, पोलिस येवून पैसे घेवून जातात अशा त-हेने गंगूचा हेतू साध्य होत नाही.

विविध भावनांचे परस्परविरोधी चित्रण करून नाट्यमयता निर्माण करण्याचा प्रयत्न बागुलांनी इथे केला आहे. भावाला पैसे पाठविण्याची आशा धरण्या-या गंगूच्या पदरी निराशा येते. गंगूचे आपल्या भावावर अतोनात प्रेम आहे तर वंचाला त्याचा तिरस्कार करते. अशा-निराशा प्रेम तिरस्कार याचे परस्परविरोधी पण प्रभावी असे भावनाट्य या कथेत साकारते.

गंगूचा भाऊ गंगूची वंचाळाची, तर पोलीस भय्या सिद्राप्पा हे गंगूची लूट करतात एकमेकांची लूट कशी क्रूरतेने चाललेली असते याचे मनस्वी चित्र या कथेत पाहायला मिळते. बाळकृष्ण कवठेकर या कथेविषयी म्हणतात, "लूटालूट' मधील वंचाळा पुतळी सोना या वेश्याच्या जीवनाची दुर्दशा झालेली पाहून आपण विषण्ण होतो, त्यांच्याबद्दल आपल्या मनात अपार सहानुभूती निर्माण होते. हे खरेच; पण त्यांना छळणाऱ्या गंगू या कुंटिणीबद्दलही आपल्याला चीड येत नाही. तर कणवच वाटते, कारण एका आगतिक आवस्थेतच ती त्यांना छळत असते. छळणारी आणि छळल्या जाणाऱ्या या दोघी एकाच व्यवस्थेच्या बळी आहे हे बागुलांची कथा सुचवतात असते[७] आणि ही व्यवस्था म्हणजे विषम समाजव्यवस्था. या विषमसमाज जसे त्यांना दुःख मिळते तसेच गंगू आणि वंचाळा यांच्या स्वभावातील वर्तनही दुःखाला कारणीभूत होते.

आर्थिक दुरवस्थेमुळे हीन झिजेने जगणारी माणसे आगतिकपणेच जीवन जगत असतात. दुःखाने पिंजलेली मने वासावाच्या विभक्ततेने सुन्न होतात. जीवन जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संग्रामात कुठेही सुखाची सुंदर हिरवळ त्यांना दिसत नसल्याने, आपल्यासुखाची तहान स्वप्नरंजनातून भागविण्याचा माणसे कसे प्रयत्न करतात याचे चित्रण 'तहान' या कथेत बागुलांनी केले आहे.

भेसूर कळाहीन जीवनात रंग आणण्यासाठी संवेदनाशील मनाचा चिध्या स्वप्नरंजनाच्या सोनेरी दुनियेत रमून जातो. प्रत्यक्षात महारोगी पाटलाच्या पोरीबरोबर पोटाच्या आगीसाठी राहणारा चिध्या, तिचे सौंदर्याने परिछुत असे वर्णन आपल्या मित्रांना रंगवून सांगतो व अतृप्त इच्छांची तृप्तता स्वप्नरंजनाने करतो. महारोगी मुलीसमवेत राहून स्वतःही महारोगी होतो हे आणखी एक विदारक दुःख त्याच्या नशीबी येते आणि आपल्या सत्याचे रूप प्रकट झाल्यावर तो उरी दुभंगतो.

या कथेत डॉ बापू, धोंडीबुवा, पुंजा महाराज ही इतरही पात्रे आपला दुःखद भूतकाळ घेवून येतात. या प्रत्येकाचे दुःख वेगळे आहे. त्यांच्या दुःखाला सामाजिक विषमतेसह त्यांचे स्वाभावही कारणीभूत आहेत. अतिसंवेदनशीलतेने विध्या तर, बायकोला खून केल्याने धोंडीबुवा आणि स्वतःच्या रंग, रूप, बांध्यामुळे डॉ. बापू दुःखी होतात.

अशा या दीनवाण्या रोजनिशा वाचताना त्यांच्या दुःखाच्या खुणा पानापानावर दिसतात दारिद्र्य हाच त्यांच्या दुःखाची खपली काढणारा क्रूर राक्षस होता. माणूसकीला विटाळणाऱ्या स्वार्थीचे दर्शन या कथेत घडवून माणसाच्या महत्तेचे चित्रण करण्याचा बागूलांनी प्रयत्न केलेला आहे.

लूटालूट शोषण हे दुःखाचे कारण असते असे बागूलांच्या कथाभ्यासावरून दिसून येते. सशक्त माणसे दुबळ्यांना लुटतात. जिथे शोषण असते तिथे तिथे दुःखही असतेच. मग हे शोषण एखादा पुरुष करेल किंवा स्त्री गिरजाची लूट एखादा सशक्त चष्मेवाला करेल, तर गंगूची लूट तोरापा, पोलीस, भैया करेल, रामूचे कागद डेव्हिड आणि वृध्द जोडपे लूटेल. या लूटीनेच दुःख जन्म घेते. दुःखातून क्रोध, क्रोधातून प्रक्षोभ निर्माण होतो. आणि हा प्रक्षोभ नकाराला प्राधान्य देतो याचे दर्शन बागुलांच्या कथातून घडते.

लुटालूटमध्ये वचाळाला छळणारी गंगू ही एक स्त्रीच आहे, सवत मजुरीत डॅनियला छळणारा त्याचा बापच आहे, आणि बापाला छळास प्रवृत्त करणारे आहे त्याचे दैन्य. हे दारिद्र्य विषमतापूर्ण समाजात जन्माला येते. आणि हा विषमतापूर्ण समाज भारतात तरी हिंदू मानसिकतेने निर्माण केला आहे याचे प्रत्यंतर कारण स्वस्त होत आहे स्पर्धा वाटेवरची लुटालूट या कथाद्वारे आपणास येते.

## दुःखाचे कारण: मानवी स्वभाव

बागुलांच्या कथेतील माणसांच्या दुःखाला काही वेळेला वर्णपध्दती जातिश्रेष्ठता या गोष्टी जशा कारणीभूत असतात, तसेच आर्थिक शोषणाने निर्माण झालेले दुःखही त्याच्या नशीबी येते. माणसाला नियतीमुळेही

काही वेळेला दु:खाला सामोरे जावे लागते हे आपण आत्तापर्यन्तच्या विवेचनात पाहिले. यापेक्षा आणखी एक दु:खं कारण म्हणजे मनुष्य स्वभाव त्याचे वर्तन. अहंकार, क्रोध, कामवासना, यामुळे माणसे विशिष्ट स्वभावाची बनतात आणि अशा व्यक्ती इतरांना छळतात अथवा ह्या स्वभाववैशिट्यामुळे स्वत:ही दु:ही दु:खी होतात याचे चित्रण बागूलांच्या काही कथांतून झालेले आढळून येते.

झोपड्यापट्टीतील एक तरुण विधवा आपले चारित्र्य संभाळून, कष्ट करुन स्वत:च्या मुलाचा प्रतिपाळ करीत जीवन जगत असते. परंतु झोपडपट्टीतील बाकीचे लोक - पुरुष आणि स्त्रियातिच्याबद्दल बाईट साईट बोलतात, तिच्या मुलाचेही मन कलुषित करतात व तिला जगणे असह्य करीत असतात ह्या द्वद्वाचा स्वाभाविक परिणाम म्हणून मुलगा आणि आई हे एकमेकांना कसे दुरावतात व त्यांची भावनिक ओढाताण कशी होते याचे करुण व अस्वस्थ करणारे चित्रण 'आई' ह्या कथेमध्ये बाबुराव बागुलांनी केले आहे.

मुले ही संस्काराने कशी निर्दय बनतात, हे दाखवून दुबळी माणसे दिवास्वप्ने रंगवतात; तसा पांडू इतरांना मारीत असल्याचे चित्र रंगवितो. पांडूच्या मनातील विविध स्थित्यंतरे या कथेत बागुलांनी वितारली आहेत. भावनांची विविध स्थित्यंतरे त्यांच्या कथांतून येतात, ती स्थित्यंतरे त्या त्या प्रसंगी योग्यच असतात शाळा सोबत्यांचे व झोपडपट्टीतील लोकांचे बोलणे ऐकून आपणंली आई व्यभिचारी आहे हा विचार पाडूच्या मनात घर करीत जातो. त्या विचाराला पोषक अशीच वर्णने बागुंलांनी या कथेत केलेली आहेत.

या कथेत मुलगा आणि आई याचे स्वाभाविक परंतु वास्तव चित्रण केलेले आहे. मुलाच्या मनातील आईविषयीच्या विचाराचा कोलादेह आणि मास्तरांनी शिकविलेली आई ही कविता या परस्परविराधी तरीही परस्परसंबद्ध भावनात्मक चित्रणातून या कथेची वीण केलेली दिसते.

ए

एका तरुण सुंदर विधवेचा छळ तिच्या आजूबाजूचा समाजच कसा करतो हे बागूल ह्या कथेत दाखवितात. दलितांच्या दु:खाला केवळ उच्चवर्णीयच कारणीभूत असतात असे काही येथे चित्रण नाही उलट दलितांच्या वाटयाला येणा-या वेदनेला दलित, स्वकीय, स्वत:चा स्वभाव हे सुध्दा कारणीभूत होतात हे येथे बागूल दाखवितात. या कथेतील सुंदर विधवेला तिचा नवरा, तिची अभिलाखा धरणारा, तिच्या जातीचा दगडू, झोपडपट्टीतील बायका यांच्याकडून दु:ख मिळते. यात आणखी भर म्हणजे तिचा मुलगाही तिच्या-पासून दूर जाऊन तिच्या दु:खात भर घालतो असे प्रत्ययकारी चित्रण बागूल करतात.

मध्यरात्री आश्रयाला आलेल्या एका स्त्रीसाठी एक आडदांड माणूस आपले सामर्थ्य कसे एकवटतो याचे चित्रण 'गुंड' या कथेत बागुलांनी केले आहे.

स्त्रीप्रेमासाठी आणि स्त्रीदेहासाठी भुकेजलेल्या या बेवारशी, शक्तीशाली आणि गुंड माणसाला स्त्री कधीच मिळाली नाही ती न मिळण्याला त्याचा अजस्त्र प्रचंड देहच कारणीभत होता. या देहामुळे उघड फिरणेही त्याला अशक्य होते. याच देहामुळे वेश्यांनीदेखील त्याला नकार दिला होता. असा हा भुकेला माणूस दु:ख वेदनांचे ओझे घेऊन जगत असतानाच एका मध्यरात्री ज्यंतीबेन मदत मागण्यासाठी येते. आपल्यासारख्या माणसाकडे स्त्री मदत मागण्यासाठी येते या भावनेने त्याच्या मनातील स्त्रीअभिलाषेचा अंकूर पालवतो. आणि तो तिला पैसे आणून देतो. बागुलांनी दादाच्या व्यक्ति-मत्वाला उठाव देण्याकरिता त्याच्या सभोवतालच्या वातावरणाचे चित्रण करुन त्या दुबळ्या लोकांच्या मनात दादाची दहशत कशी होती हे दाखविलेले आहे.

दादाच्या मनात निर्माण झालेल्या स्त्रीअभिलाषेमुळेच 'डझ शी लव्ह मी' या एकाच वाक्याभोवती त्याच्या मनात विचारविकारांची गर्दी होते. ज्यंतीला दादाने पैसे देताच ती रडते, हा अनुभव त्याला नवीन असल्याने अस्वस्थ मानानेच म्हातारीच्या प्रेताला खांदा देतो. यावेळी त्याच्या मनात निर्माण झालेल्या अस्वस्थतेचे दर्शन भोवतालच्या माणसाच्या वर्तमालून बागुलांनी केले आहे. दादाच्या प्रचंड शरीराचे आणि मानसिक खळबळीचे वर्णन करताना त्याच्या पूर्वेतिहास, त्याची सद्यस्थिती याचे वर्णन करुन

त्याच्या व्यक्तिमत्त्वाला बागूल उठाव देतात आणि हे सर्व करीत असताना बागुलांच्या सूक्ष्म निरीक्षणाचा प्रत्यय वाचकांना आल्याशिवाय राहात नाही· बागूल आपल्या पात्रांचे व्यक्तिमत्त्व विविध अंगानी चित्रीत करुन आशयाला संपन्नता आणण्याचा प्रयत्न करतात·

कलासक्त मनोवृत्तीचा, वकीलीचे शिक्षण घेऊ इच्छिणारा लक्ष्मण जाधव, मेहुण्याने आईवर बहिणीवर केलेल्या अत्याचारामुळे गुंड, खुनी कसा बनतो याचे चित्रण 'शिक्षण' या कथेत बागूल करतात· लक्ष्मणाच्या भव्य उदात्त स्वप्नांचा चुराडा मेहुण्याच्या वागण्यानेच होतो· हा मेहुणा बहिणीचा संशय घेऊन तिला मरेपरेपर्यंत मारतो आणि असाचएकदा त्याचा मार खाऊन ती आत्महत्या करते· या मेहुण्याच्या गुंड प्रवृत्तीमुळेच लक्ष्मण, त्याची आई, बहिण यांना अत्याचार सहन करावे लागत होते· या सर्व अनर्थाचे कारण मेहुण्याचा संशयी स्वभावच होता·

लक्ष्मण हा चित्रकलेची आवड असणारा हुषार विद्यार्थी परिस्थिती, नियतीमुळे दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडतो· मेहुण्याच्या अत्याचाराने त्याचे कोवळे मन पूर्ण जळून जाते· दुबळा, लहान लक्ष्मण मेहुण्याला मारण्याची स्वप्ने रंगवू लागतो· त्याला चित्रविचित्र स्वप्ने पडू लागतात· इथे बागूलांच्या मानसशास्त्राच्या अभ्यासाचे प्रत्यंतर येते· प्रतिष्ठा प्राप्त करणारे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या लक्ष्मणला दुर्दैवाने गुंडगिरीचे शिक्षण घ्यावे लागते· एका प्रतिभाशाली कलावंताचे गुंडात कसे परिवर्तन झाले याचे प्रत्ययकारी चित्रण बागुलांनी या कथेत केले आहे· बहिणीच्या आत्महत्येमुळे उरी दुभंगून, मेहुण्याला अद्दल घडविण्यासाठी तो शाळेतील शिक्षण घेण्याऐवजी गुन्हेगारीच्या जगातील गुंडगीरीचे, तालमीचे शिक्षण घेऊ लागतो· सदगुणी माणसांची संगत सोडून मवाली, गुंडांची सोबत धरतो· मनातील भीती घालविण्यासाठी गांजाच्या धुरात स्वतःला वेढून घेऊ लागतो· झोपटपट्टीत आपला दरारा निर्माण व्हावा म्हणून खून, मारामाऱ्या करु लागतो· हैवानासारखी कामे

करण्यासाठी त्याचे हळवे, माणूसपण जपणारे मन मारु लागतो. लक्ष्मणला भिणा-या मेहुण्याने त्याला जेवायला बोलावल्यावर, तेथे गेल्यावर रागाच्या भरात तो मेहुण्याचा खून करतो.

चांगुलपणा असलेल्या लक्ष्मणची खूनी होण्यापर्यंत कशी मजल गेली याचे चित्र बागूलांनी कथेत केले आहे.

कोणाच्या तरी दुष्टपणामुळे कोणावर तरी कारण नसताना दु:ख कोसळते, त्याचा विनाकरण कसा छळ होतो याचे चित्रण बागुलाच्या 'जुलूम' या कथेत आढळते.

मवाली आणि पोलीस यांच्या तावडीत सापडलेल्या एलिझाच्या तडफडत्या हृदयाची, हृदयस्पर्शी हकीकत या कथेत आली आहे. निरपराधी नव-यासाठी वेडी होऊन दारोदार फिरुन जामीन शोधणारी एलिझा वाचकाच्या मानत आपल्या विषयी सहानुभूती निर्माण करते.

शरीराने सुंदर पण व्यवसायाने सुतारकाम करणारा, गरीबी आणि दु:खात वाढलेला फ्रेडरिक सुंदर एलिझाबरोबर प्रेमविवाह करुन तिला अतल्या झोपडीत आणतो. तिच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन मायकेलदादा तिच्या मागे लागतो. आणि त्याचा राग येवून फ्रेडरिकने मद्यकेलला लोळविले होते. त्यावेळेपासून मनात डूख धरुन फ्रेडरिक आणि एलिझाला तो छळत होतो. त्याने सरवासमवा खून करुन, पोलीसांना पैसे देऊन त्या खूनाचा आळ फ्रेडिरकवर आणला होता. खूनी नसलेल्या पण पोलीसांनी कैद केलेल्या आपल्या नव-याला सोडविण्यासाठी भटण्यासाठी ती पोलीसस्टेशनला येते. कायधाचे रक्षण करणारे पोलीस एका सुखी माणाच्या आयुश्याचे भक्षण करु पाहात होते. पोलीस तिची फसवणूक करुन तिला जामीन आणायला सांगतात आणि पतीप्रेमाने वेडी झालेली, भोळी एलिझा जामीन आणण्यासाठी वणवण फिरत होती.

कामासक्त मद्यकलमुळेच फ्रेडरिक आणि एलिझा यांच्या सुखी संसाराला दु:खसर्पाने वेढले होते. कुणाच्या जीवनात न डोकावता आपले जीवनसुध्दा

झोपडपट्टीत माणसांना सुखाने जगत येत नाही. झोपड्यात राहणा-या माणसांच्या जीवनातील सुरक्षिततेला विनाकारण धक्का बसतो. आपले काम करून व्यवस्थित जगणा-या माणसांना समाजातील इतर लोक कसे नीट जगू देत नाहीत याचे चित्रण या कथेत येते. फ्रेडरिक, एलिझाचा छळ करण्यासाठी कुणी वरच्या वर्गातून येत नाही तर बाहेरच्या जगात असणा-या अपप्रवृत्तीचे रूप घेऊन मायकेल त्यांना दु:ख देतो. इथे दु:ख देणारा कुणी उच्चवर्णीय नाही आणि सहन करणारा कुणी दलित नाही. दु:छळणारे आणि छळले जाणारे एकाच ख्रिश्चन जातीतले आहेत. निरपराध माणसांना कायदाही कसा न्याय देण्याऐवजी दु:ख देतो याचे वास्तव चित्र या कथेत दाखविले आहे.

कोलंबस आणि त्याचे साथीदारही जीवन जगण्यासाठीच गुंडगिरी करीत असतात. तर आपल्या मुलीसाठी आणि स्वत:चे जीवन जगण्यासाठी एखादी गिरजेसारखी वेश्या शरीरविक्रय करत असते. दोघांचीही धडपड जीवन जगण्यासाठीच असते. फरक असतो तो, तो कोणत्या पद्धतीने पैसे मिळवितात एवढाच. जीवन जगण्यासाठी माणसांना कसे जगावे, वागावे लागते याचे चित्रण 'मवाली' या कथेत बागूल करतात.

पडित स्मशानामध्ये मार खाल्लेले मवाली आश्रयासाठी आले होते तर, जागा भाडे जाऊ नये आणि कळत्या मुलीला माहिती होऊ नये म्हणून गिरजा गि-हाईक घेऊन त्याच स्मशानामध्ये आली होती. गिरजा या तिच्या हीन कृतीमध्येही श्रेष्ठ वाटते.

मवाल्यांच्या जगातील सूक्ष्म बारकावे, मारामा-या, हेवेदावे, स्त्रीआसक्ती यांचे चित्रण बागुलांनी समर्थपणे या कथेत केलेले आहे. या कथेतील कोलंबस, पिटर, लाल्या, रफायल, काशिनाथ यांच्यासह बाश्याचाही व्यक्तिचित्र उठावदारपणे लेखकाने चितारले आहे. त्यासाठी बागूल त्यांच्या मनातील ताणाबाणाचे परस्परविरोधी धागे तर गुंफतातच परंतु त्यांच्या भावनांची विविध स्थित्यतरेही ते सुक्ष्मरितीने साकारतात. व्यक्तीमत्वाच्या पूर्णतेसाठी ते ज्या जगात वावरतात; त्याचे चित्रण पार्श्वभूमी म्हणून जीवंतपणे करतात.

मवाल्यांच्या जगामध्ये एकमेकांत कसे देवेदावे असतात, एकमेकावर कसे प्रेम असते; प्रतिस्पर्ध्याला नामोहरण करण्यासाठी हल्ला कसा केला जातो, बेकायदेशीर धंदा करणारे इतर गुंडाकडून त्रास देणा-या, हप्ता घेणा-या गुंडाना कसे मारतात, पोलिस त्यात कसे सामील होतात याचे बारीक सारीक तपशीलावह वर्णन करून, एका नव्या जगाचे दर्शन बागूल करून, एका नव्या जगाचे दर्शन बागूला घडवितात ते लक्षणीय आहे.

'अराजक' ही कथा एक वेगळे व्यक्तिमत्त्व उभे करण्याच्या हेतूनेच ब बागुलांनी लिहिलेली दिसते. या कथेतील बुवांचे व्यक्तिमत्त्व नेटकेपणाने, सर्व अंकासह उभे करण्याचा प्रयत्न बागुलांनी केला आहे. बुवा हे अतिशय तीव्र बुध्दीचे सतप्त वृत्तीचे आहे. या वृत्तीतूनच बुवांना आयुष्यभर प्रचंड दु:खाच्या दडपणाखाली जगावे लागले होते. अस्पृश्यांच्या आंदोलनातील एक प्रचारक म्हणून त्यांनी जरी समाजाचा अभ्यास केला असला तरी, त्यांच्या जीवनातील तत्वज्ञान सतप्त विद्रोही होते. त्यामुळे हिंदूधर्म, देवदेवता, यांच्या विषयीचा राग,द्वेष त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होई असे.

उच्च आध्यत्मिक पातळीवर पोहोचलेल्या बुवांच्या मनस्थितीचा अंदाज न आलेले लोक व त्यांची पत्नी त्यंना समजून घेत नव्हते, याचेच त्यांना दु:ख होते. भांडखोर, संतप्त, तीव्र, बुध्दिमान, अभ्यासू, आणि माणसाच्या महत्तेवर विश्वास ठेवण्याची वृत्ती; या बुवांच्या व्यक्तिमत्वाच्या कडान् कडा लहानसहान प्रसंगाचे चित्रण करून बागुलांनी चितारल्या आहेत. लोकांनी नसले तरी आपल्या पत्नेतरी आपल्याला समजून घ्यावे, साथ द्यावी ही त्यांची अपेक्षा पण तिवाही भंग होतो. व त्यामुळेच ते संतापतात्व व विद्रोही भाषा वापरु लागतात. त्यांच्या मनातील प्रचंड उलथापालथ बागूल या कथेत चित्रीत करतात. आक्रस्ताळ्या वाटणा-या बुवांच्या मनात माणुसकीचा फार मोठा साठा होता. माणसाला, मातृत्वाला ते मोठे मानतात. म्हणूनच बाळंत होणा-या पत्नीची काळजी घेतात.

या कथेतील बुवाचे दु:ख हे फारसे बाह्यकारणांनी निर्माण झालेले नव्हते तर ते स्वभावजन्य आहे असे म्हणता येईल.

सूर्याचे सांगाती या विविध कथाबीजे असलेल्या कथेत जीवनामध्ये दु:ख असले तरी सुख हे कधीतरी येईल ह्या विचाराचा एकात्म संस्कार मनावर होतो. बागुलांनी चित्रकार नाखवा, कथालेखक शंकर जाधव, कवी संजय कुलकर्णी विचारवंत श्रीधर सावंत आणि क्रांतीकारी चाचा या या सर्व भावनाशील माणसांच्या जीवनातील दु:खाना एकाच धाग्यात गुंफण्याचा प्रयत्न सुरेख पध्दतीने केलेला दिसतो. या कथेतील पात्रांच्या प्रत्येकाच्या जीवनाचा दु:ख हा स्थायीभाव आहे. दु:खाने या सर्वांची अंत:करणे करपली आहेत. आणि हे सर्व कलावंत असल्याने ते दु:ख त्यांच्या मनातील हळूवार भावनांना बेचिराख करते . या कथेद्वारे विचारवंत बाबुराव बागुल आणि त्याचे टीकाकर यांचेच संभाषण चालू आहे की काय ? असे वाटते शंकर जाधवच्या रुद्रभयंकर पण वास्तव तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवरच संजय कुलकर्णी आणि चाच्यांच्या दु:खी जीवनाचा इतिहास आपल्यासमोर येतो.

नाखवा हा देश, धर्म, संस्कृती यावर प्रेम करणारा आहे. दलित साहित्य आणि साहित्यिक ज्या प्रमाणे देश, संस्कृती यांना नकार देतात, त्याविरुध्द बंड करतात त्याप्रमाणे शंकर जाधवचे ज्वलज्जहाल विचार आहेत. संजय कुलकर्णीला दोन प्रकारचे दु:ख आहे एक बायको त्यचा त्याग करुन अविनाशबरोबर गेल्याचे आणि ज्या ठिकाणी सामाजिक सुधारणा व्हावी म्हणून आयुष्यातील दहा वर्षे घालविली तेथील लोक अजूनही दलितांना माणूस समजत नाहीत याचे या दु:खाने त्याचे मन दुभंगले आहे. संजय कुलकर्णी या हळव्या प्रवृत्तीच्या माणसाच्या बुध्दिमत्तेची जाण लोक ठेवती नाहीत. या देशातील दारिद्र्याने हीन मनोप्रवृत्तीच्या माणसाने आपले माणूसपण कसे गमावले आहे हे सांगून माणसाचे महत्त्वही तो वर्णन करतो.

क्रांतिकार्यात भाग घेणा-या काकाचे हाल त्यांन स्विकारलेल्या कार्यामुळे झाले. दैन्य,दारिद्र्याने त्याची बायको वेडी होऊन वारली. त्याच्या स्वाभीमानी मुलीने घराची जबाबदारी अंगावर घेऊन घर चालविले. पण तिची बहिण जुबेदाने अपमानित होऊन जीव दिल्यावर जाहिराही वेडी

झाली. श्रीधरने तिला मदत केली. दवाखाना केला आणि वडिलांना पाहताच पुन्हा ती वेडी झाली. जिच्याशी संसार करायची स्वप्ने रंगविली होती, ती परिस्थितीच्या आघाताने, नियतीच्या प्रहाराने वेडी झाली. म्हणून श्रीधर दु:खी होता.

समाजसेवा करण्याच्या व्रताचे फळ बायको घालवून दु:खी होण्यात संजय कुलकर्णीला मिळाले तर क्रांतिकारी कार्याची पावती घरादाराची राख होऊन त्याच्याला मिळाली. या कथेतील पात्रांच्या स्वभावातील कोणत्यातरी एका उदात्त वेडाने त्यांना दु:ख प्रपप्त झाले होते. एवढा दु:खप्रद अनुभव येवूनही ही माणसे जीवन जगू इच्छित होती. कलासक्त माणसांच्या जीवनाला बुडवून टाकणा-या दु:खाचे चित्रण करण्यात बाबुराव बागूल यशस्वी झाले आहेत. या कथेतील व्यक्तिंच्या व्यक्तिमत्त्वाला त्यांच्या जीवनदर्शनाने उठाव आल्या-सारखा दिसतो. बागूल आपल्या कथांच्याद्वारे हिंदूधर्म,देश, संस्कृती यांना नकार देतात, मानवाला श्रेष्ठ समजतात. या त्यांच्या भूमिकेचे प्रत्यंतर या कथेत नाखवा आणि शंकर जाधव यांच्या संभाषणातून जसे येते तसेच संजय कुलकर्णी-च्या बोलण्यातूनही येते.

'<u>भोंडवल</u>'या कथेत बाबुराव बागुल यांनी माणसासारखी माणसे दारिद्र्यात कशी पशुपातळीवर जाऊन वर्तन करतात ते दाखविले आहे.

शहरातील आर्थिक दुरवस्थेमुळे झोपडपट्टीत फेकली जाणारी माणसे दारिद्र्याने दु:खी होतात. त्यांच्या दु:खाचे कारण अस्पृश्यता नसेलही. मात्र बाहेर फेकल्याने ते एकप्रकारची अस्पृश्यताच भोगत असतात. तेथील असं-स्कृत परिस्थितीने त्यांना दु:ख प्रपप्त होते. त्या दु:खाच्या प्रभावाने ती संहारक बनतात, आसुरी प्रवृत्तीची होतात. निसर्ग झोपडपट्टीतील ह लोकांच्या यातनात भर घालतो. नटा ही स्त्री या कथेची केंद्रवर्ती व्यक्ति-रेखा आहे. सर्व दु:खाचे कारण आपला महाकाव्य शरीराचा आणि प्रचंड भुकेचा पांगळा बापच आहे असे तिला वाटते. आणि या तिच्या विचारांची आवर्तने या कथेत फेर धरु लागतात. जीवन जगण्याची आसक्ती माणसाला कोणत्या स्तराला नेऊ शकते हे रुपा म्हाता-याच्या जीवनालालसेवरुन आपल्या लक्षात येते.

दारिद्र्याने गांजलेल्या झोपडपट्टीचे जिवंत, प्रत्ययकारी पण तितकेच अंगावर रोमांच उभे करणारे चित्र बागुलांनी या कथेत चितारले आहे. आजारी नव-याचा बचाव करण्यासाठी नटा सर्व तऱ्हेचे प्रयत्न करते. क्षयाने आजारी असणा-या नव-याला औषधपाणी करण्या एवढाही पैसा तिच्याजवळ नाही. म्हणून थंडीपासून आणि जमीनीच्या ओलाव्यापासून त्याचे संरक्षण करण्याकरिता काँटही आणू शकत नाही. रुपा म्हाता-याच्या अफाट आहारामुळे त्याला खाऊ घालण्यातच तिचा पैसा खर्च होऊ लागला. आणि त्यामुळेच आपला नवरा पावसाने कळा लागून मेला हेच दुःख तिला बोचत होते. नव-याला उब मिळावी म्हणून ती त्याला आपल्या मीठीत घेते अशा पध्दतीने वागणा-या मुलीच्या वर्तनाची संगती रुपा म्हाता-याला लागत नाही. भूक आणि दुःख यातनांनी ज्याचे व्यक्तिमत्व भावनाहीन झाले होते असा रुपा म्हातारा आणि आपल्या देहाचे पावित्र्य सांभाळणारी नटा यांच्यातील संघर्षाने ही कथा पुढे सरकत जाते. रुपा म्हाता-याचे पूर्वायुष्यही मोठे रंजक आणि रंगेल होते. त्याच्या पौरुषावर भाळून अनेक बायका मागे लागत. पाटलाच्या पोरीच्या नादात त्या उच्चवर्णीयांची त्याचे पाय तोडले. तो लुळा-पांगळा झाला. भावंनी त्याच्या मोठ्या आहाराला कंटाळून बाहेर काढली. भीक मागितल्यामुळे जीतीबाहेर काढला. आणि बापाची दया येऊन नाटाने त्याला आपल्याकडे आणले. त्याच्या आहाराने तीही रंजीस आली. पैसे मिळविण्यासाठी देहाचे भांडवल करुन जगण्याचे तिला जमत नव्हते आणि म्हातारा भुकेने तडफडत होता. रिकाम्या पोटाने म्हातारा दैत्य बनला आणि भीक मागण्यासाठी नटाच्या लहान मुलाला लुळा पांगळा करण्यासाठी पाय पिरगळू लागला. भीकेचे भांडवल तो तयार करीत होता. म.द. हातकणंगलेकर म्हणतात, या नरकाची भेसूरता वाढविणारी इतर चित्रेही या कथेत आली आहेत. चिखल तुडवित व उकाशी उभार नाचवित जाणा-या तरण्या पोरी या कथेत येऊन जातात. पोटासाठी चामडी चालवण्याचा धंदा त्यांना सुखाचा वाटतो. याच धंद्यात मुरलेली गुणा मात्र पोटुशी राहते तेव्हा पोराच्या बापाखेरीज सारे पुरुष तिचे भाई बनतात बागुलांची ही पसरत जाणारी कथा चढतही जाते आणि दुःखाचा धारदार फाळा उभा करते.[६] हे त्यांचे विधान यथार्थ आहे असे म्हणावे लागते.

जीवन जगण्यासाठी या असंस्कृत जगात कोण कशाचे भांडवल करेल सांगता येत नाही. तरण्या पोटी देहाचे भांडवल करतील तर त्या म्हातारा भीक मागण्याच्या धंद्यासाठी नातवाला लुळापांगळा करून त्याचे भांडवल करेल. जीवनाच्या विदारक वास्तवावर प्रकाश पाडणारी बाबुराव बागूल यांची ही कथा श्रेष्ठ दर्जाची साहित्यकृती आहे.

## झोपडपट्टी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथात्मक साहित्याचे विशेष·

या विभागात येणाऱ्या कथांच्या अभ्यासावरून त्यांचा साहित्यातील विशेषांचे आपणास दर्शन होते·

### वेगळे पण जीवंत अनुभव·

कथामधून बागुलांनी जे जीवंत अनुभव चित्रित केले आहेत; त्यामागे बागुलांचे झोपडप्पट्टीच्या जीवनात घेतलेले ज्वालेप्रमाणे भडकणारे अनुभवविश्व आहे· दलित म्हणून जीवन जगताना त्यांना आलेल्या लोकविलक्षण अनुभवांची गुंफण ते कथेत करतात· दरिद्री, हीनदीन अशा झोपडपट्टीतून बागुलांना माणसाच्या महत्तेचा साक्षात्कार झाला आहे· त्याचेच चित्रण त्यांची कथा करते· बागुलांची कथा वेगळ्या वास्तवाचे भीषण दर्शन घडविते·

आकाशाकडे झेपावणारे पण अंगावर काटा आणणारे, मांगल्य मनमोहित करणारे पण भयानकतेची जाणीव तीव्रतेने करून देणारे, उग्र पण दाहक असे बागुलांचे अनुभवविश्व आहे· बागुलांनी व्यक्त केलेली अनुभव हा नागर समाजाने बहिष्कृत केलेल्या शोषित पीडितांचे, ज्यांचे संस्कृती-संस्काराशी विळ्याभोपळ्यासारखे सख्य आहे अशा माणसांचे आहेत· पण ही सर्व माणसे माणूस म्हणून जगत असल्याने मानवाच्या षड्विकाराचे टोकाचे स्वरूप गाठण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसाच्या अनुभवाचे, विकृतीच्या सीमारेषेवर जाणाऱ्या माणसांच्या अनुभवांचे प्रत्यंतर त्यांच्या कथांतून घडते· बागुलांचे अनुभव बधिर करणारे; लैंगिकतेचे चित्रण करणारे आहेत·

मराठी साहित्यात ज्यांत ज्यांच्या जीवनाचे चित्रण कधीच केले नाही अशा समाजातील खालच्या स्तरातील लोकांच्या जळजळणाऱ्या जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे· ह्या माणसांच्या आयुष्याला दुःख, दैन्य, असंस्कृतपणा, संस्काराचा आभाव, विकृती यांचा शाप लागलेला आहे·

त्यांच्या कथातून येणारा अनुभव त्यांनी भोगलेला असल्यामुळे तो वास्तव असतो, दैन्य दारिद्र्याच्या आगीने होरपळल्यामुळे तो विलक्षण जीवंत असतो· तो ज्या जगाचे चित्रण करतात ते जगच रौद्र, प्रलयंकारी,

पिसार, बेभान असल्यामुळे त्यांच्या अनुभवात भीषणतेचा प्रत्यय येतो.

शंकर सारडा म्हणतात,"मराठी वाङ्‌मयाला सर्वस्वी नवीन अशा अनुभूतीचे खडक फोडणाऱ्या, विशेषत: उपेक्षितांच्या जीवनातील रांगडेपणाचे, हिंसक हिंस्त्रपणाचे आणि तितक्याच उत्कट लोभ-स्नेहाचे नानाविध क्षण टिपणाऱ्या कथा अधिक लक्षणीय आहेत.[७]"

पांढरपेशी लेखकापेक्षा वेगळे अनुभव बागुलांनी भोगले आहेत. त्यांच्या अनुभवविश्वातील माणसे गरीब आहेत, या गरीबीचा शाप त्यांचे जीवन शापित करते. इथल्या जीवनात भूक ही केंद्रवर्ती असते. भुकेमुळेच इथे सर्व काही घडते. भुकेसाठी ते भांडण, मारामारी करतील देह विकतील, मुलांना पांगळे करतील, स्त्री देहाकडे पैसे मिळविण्याचे साधन म्हणून पाहतील. मारामारी, खून, देहविक्री करताना कुणालाच गैर वाटत नाही. भूक भागविण्यासाठी इथली माणसे कोणत्याही पातळीवर जगतात. किडामुंगीसारखे जीवन जगणारी माणसे राहतातही घाणीत, किळस आणणाऱ्या वातावरणात ही माणसे पशुपातळीवर जाऊन जिणे जगतात. दुसऱ्याच्या जीवनाचा विध्वंस करताना त्यांच्या मनाला वेदना होत नाहीत.

<u>व्यक्तिचित्रणाचा जीवंतपणा व वेगळेपणा</u>

बागुलांच्या कथेतील व्यक्ती नेहमीच दु:ख, दैन्य यांच्या विरोधात संताप, विद्रोह प्रक्षोभ करून उठतात. रागाने क्रुद्ध झालेली, बेभान, उतावीळ झालेली कितीतरी पात्रे त्यांच्या कथात येताता. शब्दांचे जबरदस्त वार करून समोरच्याला जमीन दोस्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. मनातील भावनांच्या भोवऱ्यात ते सदैव गरगरत असतात. 'विद्रोह' मधला जय, 'सवत मजुरी' तला फर्नांडिस, 'अराजक' मधला बुवा, 'गुंड' मधला दादा, 'कवीतेचा जन्म' मधला तरुण, 'सूर्याचे सांगती' मधला जाधव यांच्या मनात ज्वालामुखी नेहमी खदखदत असतो. बागुलांच्या कथेतील पात्रे मांजराप्रमाणे एकमेकाबरोबर भांडतात, मारामारी करतात, बिब्याचे तेल टाकून विद्रूप करण्याचा प्रयत्न करतात.

बागुलांचे पात्रचित्रण रसरशीत, जीवंत असते. ही पात्रे सजीव

वाटावती म्हणून लेखक ह्या पात्रांचे देहवर्णन तर करतोच पण त्यांच्या मनातील, विचार, विकारांचेही चित्रण करतो. अल्प वर्णनात त्या व्यक्तीचे वैशिष्ठ्ये दिसावती म्हणून मनोभावना सूक्ष्मपणे चितारतात. 'लूटालूट' मधील वंचाळाचे वर्णन करताना लेखक लिहितो, 'वंचाळाचा फुलासारखा नाजूक चेहरा क्रोधाने कठोर झाला होता. तिच्या मधूर डोळ्यात द्वेष धगधगत होता. तिच्या हातात त्वेषाने दाबलेले एक पत्र होते'[६७] या वर्णनातून वंचाळाच्या फुलासारख्या नाजूक देहाचे, तिच्या डोळ्याचे जसे दर्शन लेखक घडवितो तसेच तिच्या मनातील क्रोध, द्वेष, त्वेष याचेही दर्शन आपणास या वर्णनातून घडते.

बागुलांचे नायक धिप्पाड पिळदार शरीराचे, अफाट ताकदीचे आणि कणखर असतात. डेव्हिडदादाचे व्यक्ति चित्र रंगविताना बागूल लिहीतात, 'त्याने आपली पसरट पुष्ट पाठ माडाला टेकवली होती. आणि कसलेले पाय माडाच्या बुंध्याच्या उंचवटयावर पसरले होते. त्यांच्या डोईचे रक्ताने भरलेले केसाचे झुबके कडक होऊन त्याच्या कानावर नि गो-या तांबुस कपाळावर लोंबत होते. खूप मार पडला होता तरी त्याची नम्र न होणारी मान ताठ होती. माणुसकीचा अन् अमाणुसकीचा प्रत्यय देणारी त्याची प्रशस्त धाती थंडीचे तडाखे सहज झेलत होती ... त्याच्या सहज बघण्यात ही वाघाची अहंकारी अक्कड होती'[१] या डेव्हिडदादाच्या लेखकाने केलेल्या वर्णनातून त्याच्या देहयष्टीचे, स्वभावाचे दर्शन वाचकास घडतेच. 'म्वाली' मधला कोलंबस, 'गुंड' मधला दादा ही सर्व डेव्हिडप्रमाणे शक्तीमान माणसे आहे. त्याचे बरेच नायक तीव्र बुध्दीचे, कलावंत वृत्तीचे आहेत.

या पात्रांचे चित्रण करताना त्यांच्या मनातील भावना-विकारांची आणि त्यांच्या वर्तनाची एक संगती बागूल दाखवितात. 'सक्तमजुरी' मधील फर्नांडिस बायकोला मारतो, मुलावर रागावतो, सहका-यावर चिडतो ते दारिद्र्याने विषण्ण झालेल्या मनोवस्थेमुळे.

'तहान'मधील धोंडीबुवा हसले, रडले तरी रागावतो. स्त्रियांबद्दल बोलले तरी भडकतो आणि देवाचे नाव काढताच संतापतो. अराजक मधील बुवाचे वर्तन असेच चक्रावून सोडणारे आहे. अशा माणसांचे चित्रण करीत असताना बागुलांनी कमालीचा संयम पाळला आहे. ही सर्व माणसे कमालीची रागीट, क्रूर, स्वप्नरंजनकरणारी, लाचार आहेत. बागुलांच्या कथेतील बरीचशी पात्रे विकृतीच्या आसपास वावरणारी असली तरी बागुलांच्या व वैशिष्टयपूर्ण चित्रणामुळे ती तशी झाली नाहीत हे विशेषत्वाने नमूद करावे वाटते.

बागुलांच्या पात्राविषयी भालचंद्र फडके म्हणतात,'या व्यक्ती चारचौघासारख्या मुळीच नसतात. त्या मनस्वी असतात. त्यांना भूका असतात व आपली भूक तृप्त करण्यासाठी त्या रुढ मार्ग कधीच आचरीत नाहीत... हवे ते सुख ओरबाडून घेण्यात त्यांना रस वाटतो.'[१०] फडके यांनी सांगितलेल्या या पैलुबरोबरच व्यक्तिमनातील विविध गुंतागुंतीची चित्रण बागूल करतात. लुटालूट मधील गुंगू इतर बायकाशी क्रूरपणे वागते, त्यांना बळजबरीने धंधाला लावू पाहते, दादावरवी त्यांना फोडून काढू पाहते, परंतु तिच्या मनात आपल्या गावाकडच्या भावाबद्दल विलक्षण कोवळीक आहे, व त्याच्या मागणीप्रमाणे त्याला पैसे पाठविता यावेत म्हणून ती क्रूर बनलेली असते. बागूल हे माणूस सामग्राने समजून घेतात. म्हणून त्यांची व्यक्तिचित्रे अत्यंत जिवंत झालेली आहेत. स्त्रियांचे दलितत्व ते असे प्रभावीपणे चित्रितात.

बागुलांच्या कथेमध्ये येणा-या स्त्रिया या पुरुषाच्या आणि समाजव्यवस्थेच्या टाचेखाली चिरडून जातात. नव-याला बरे करण्यासाठी स्पर्धामधील चंद्रा वेश्येसारखी वागते, तर मुलाचा आजार नीट करण्यासाठी वाटेवरची गिरजा विकृत विकृत वासनेचा बळी होऊन मृत होते, भावाला पैसे देण्यासाठी गंगू क्रूर होते तर वंचाला संतापून उठते, मुलाने आपली मानवी नाही म्हणून मुकादमाशी पांडूची आई घरोबा करते, आपल्या मुलाला आपल्यामुळे ज्याच्या मनाविरुद्ध भंगीकाम करावे लागते म्हणून आतून जळणारी विद्रोह मधी भानी, भांडण करणा-या नव-या बरोबर राहून त्याच्या शिव्याशाप खावून त्याची काळजी करणारी अराजक मधील चंद्रभागा, नव-याच्या जामीनासाठी दारोदार फिरणारी एलिझा, मुलगा आपल्यापेक्षा बायको-

बरोबर जास्त बोलतो म्हणून दु:खी होऊन तीच्याशी भांडण करणारी कवितेचा जन्म मधील आई अशी ही स्त्री पात्रे विलक्षण आहे. दलित स्त्रीयांच्या दु:ख दैन्याचे, त्याच्या मनातील आगडोंबाचे वास्तव चित्रण बागुल आपल्या कथातून करतात.

बागुलांच्या कथेतील स्त्रिया या पोटासाठी धडपडणाऱ्या आहेत. त्यासाठी त्या वेश्याव्यवसाय सुध्दा करायला कमी करीत नाहीत. माणसांची घाण काढणे , झाडू मारणे, भीक मागणे ही कामे करताना त्यांना काही वाटत नाही. कष्ट, दु:ख, दैन्य हात अपेष्टा या स्त्रियांना सहन करावे लागते.

## झोपडपट्टीचे प्रत्ययकारी वर्णन

कर्णिक, दळवी झोपडपट्टी जीवनाचे चित्रण करतात, पण ते वरवरचे असते. बागूल मात्र त्या जीवनाचे, झोपडपट्टीचे प्रत्ययकारी वर्णन करतात कारण बागुलांनी त्या जगाचा घेतलेला जिवंत अनुभव, त्या जगात भोगलेले जीवन हे आहे.

'झोपडपट्टीत राहणाऱ्या, आर्थिक सामाजिक दृष्टया दलित म्हणून जगणाऱ्या दलितांच्या झोपडपट्टीतील जीवनाचे आणि तेथील वातावरणाचे अस्सल चित्रण आपल्या कथांतून बागुलांनी केले आहे. बागुलांची कथा प्रथमच झोपडपट्टीला जिवंतपणे उभी करते. तिथले दारिद्र्य, तिथल्या पिसाट वासना, तिथले संज्ञाहीन जगणे ते रंगवतात. या झोपडपट्टीच्या भूक आणि वासना या आदिम प्रेरणा आहेत. असे ते सांगतात.'[११] हे फडक्यांच्या विधान सत्य आणि यथार्थच आहे. भाकवल, अराजक आई मरण स्वस्त होत आहे इत्यादि कथातून झोपडपट्टीचे तपशीलाने वर्णने केलेले दिसते. फडक्यांच्या विधानाला दुजोरा देताना बाळकृष्ण कवठेकर म्हणतात. 'बागुलांच्या कथेतील झोपडपट्टीचे चित्रण केवळ भौगोलिकदृष्टयाच प्रत्ययकारी आहे, असे नव्हे. झोपडपट्टीच्या संस्कृतीचे समग्र दर्शन त्यांची कथा घडवत असते'[१२]

झोपडपट्टीतील जीवंत तपशील सर्वअंगासह बागुलांनीच प्रथमच सविस्तरपणे मराठी वाङ्‌मयात आणली. झोपडपट्टीच्या जीवन-मरणाच्या कलहाचे वर्णन करताना त्यांची लेखणी बेफाम होते. तिथल्या नैसर्गिक भावनांचे ती प्रत्ययकारी चित्रण करते. या झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांना द दारिद्र्याने त्यांच्या जीवनात दुःखाने थैमान घातले आहे.

झोपडपट्टीतील माणसे भुकेने ग्रस्त आहेत मग ती भूक इंद्रीयाची असो नाही तर पोटाची याच पोटासाठी माणसे देह विकतात, जुगार खेळतात, भिक मागतात, सुतारकाम करतात, औषधे विकतात, महारोगी पोरीबरोबर राहतात, हलक्या संस्कृतीच्या माणसाच्या मुलीची शिकवणी करतात. झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांना ही भूक हैवान, सैतान बनविते. मन बेचिराख करते. पोटाला मिळविण्यासाठी नीती नियमांच्या संकल्पनांना पायरली तुडवितात. भुकेने संत्रस्त होऊन माणूसपणही ते विसरतात.

इंद्रियाच्या भुकेनेही या झोपडपट्टीतील माणसांना गस्त केले आहे. त्यासाठीच बुवा आधळी बायको पत्करतो, पांडूची आई मुकादम ठेवते, सोना अनोळखी माणसाच्या पांघरुणात शिरते, भिमू कदम व्यभिवारी मणीवाली मद्राशीचा स्वीकार करतो. कामासक्त पीटर गिरजावर बलात्कार करुन पाहतो. मायकेल एलिझाच्या मागे मागे लागतो. जयंतीबेनवर आफ्रिकन दादा भाळतो. किसन चंद्राच्या शेजेसाठी झुरतो. ही माणसे कामवासनेने अतृप्त आहेत. इंद्रियाच्या भुकेसाठी कोणत्याही स्तराला जायला ते कमी करीत नाहीत. या इंद्रियाच्या भुकेने अनेकांच्या सुखी जीवनात वादळे निर्माण झाली आहेत. झोपडपट्टीत राहणारी ही माणसे भूक बळी आहेत. या भुकेचे जीवंत, प्रभावी भीषण चित्रण या कथांद्वारे बागुलांनी चित्रीले आहे.

आधीच दुःखी असणाऱ्या दुःख दैन्यात झोपडपट्टीतील असांस्कृतिक वातावरण कसे भर घालते, तेही याप्रकारच्या कथांतून पहावयास मिळते.

## सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय

समाजातील विषमतेनेच दलितांच्या जीवनाची होळी केली आहे· धर्म, वर्णव्यवस्था, रूढीपरंपरा यांनी दलितांना भरपूर दुःखवेदना दिल्या आहेत· म्हणून असे दुःख भोगणाऱ्या दलित माणसाचे चित्रण केले पाहिजे, त्याच्या जीवनाला केंद्रबिंदू मानले पाहिजे अशा विचाराने, सामाजिक बांधीलकी पत्करून लेखन करणारे बागूल हे लेखक आहेत· या त्यांच्या भूमिकेचे प्रतिबिंब त्यांच्या कथाविश्वातून दिसते· 'विद्रोह'चा नायक धर्मावर आसूड ओढतो, देशाचा धिक्कार करतो, संस्कृतीला तुच्छ लेखतो· आणि मानवतेचा स्वीकार करतो· जेव्हा मी जात चोरली होती या कथेचा नायक त्याचा मार मी कुठे खाल्ला ? मनूने मला मारले![१३] असे म्हणतो या त्याच्या उद्गारातून वास्तव समाजस्थितीचे दर्शन घडते· सूर्याचे सांगाती मधील शंकर जाधवच्या वक्तव्याने लेखकाच्या सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय वाचकांना येतो· कवठेकर म्हणतात, 'बागुलांच्या सामाजिक बांधिलकीने त्यांना दुःख - दैन्य - विकृती - अनाचार यांचे रोचक - रंजक - सवंग चित्रण करू दिले नाही, तर हे आपल्याच समाजाचे अविभाज्य पण ज्याच्या परिवर्तनासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे वास्तव असल्याची जाण त्यांच्या कथेत आलेली आहे'[१४] या बाळकृष्ण कवठेकरांच्या विधानातून सामाजिक बांधिलकी आणि बाबुराव बागूल यांचे एकात्मरूप स्पष्ट होते·

## कामवासनेचे योग्य जाणिवेने केलेले चित्रण

बागुलांच्या अनेक कथांमधून कामवासनेचे चित्रण येते· बागुलांच्या साहित्यावर टीका करताना विजय सोनवणे म्हणतात, 'विषय वासनांच्या कर्दमात ते रुतले असून वासनाविकारांच्या भोगाला ते जवळ करीत आहेत··· माणसाच्या भोगलालसेची अतिरंजित चित्रे रंगविणे हा बागुलांचा स्वभाव आहे'[१५] बागुलांच्या कथांचे तसेच त्यांच्या भूमिकेचे यथार्थ आकलन नसल्याने सोनवणे असे विधान करतात· कारण बागुलांच्या

कथेत येणाऱ्या विषयवासनांच्या चित्रणामुळे वाचकाच्या मनोवृत्ती चाळवल्या जात नाहीत, भावना उद्दीपित केल्या जात नाहीत. त्यांच्या कथेमध्ये जे कामवासनेचे चित्रण येते, त्या पाठीमागे एका श्रेष्ठ कलावंताची भूमिका आहे. जीवनाच्या भयानकतेचे तीव्रतेने दर्शन व्हावे, वाचकाच्या मनावर दैन्याच्या जाणिवेचा ठसा उमटावा म्हणून बागूल कामवासनेचे चित्रण करतात. बागूल कथांमधील वातावरणाच्या पोषणासाठी वासना-विकाराचे चित्रण करतात. 'च्यायाला! आवा डोळा मारतीया'![१६] या 'वाटेवरची' या कथेतील पट्टेलवानाच्या वाक्यातून तिच्याविषयीचा रागच बागूल व्यक्त करु पाहतात. 'वानर' मध्ये बापू सखूला अंगावर ओढतो आणि 'आवेग ओसरेपर्यंत आवळून धरतो यातून बापूच्या हिंस्त्रतेचे आणि सखूच्या अगतिकतेचे दर्शन घडते. 'अराजक' मधील चंद्रभागाचे वर्णन करताना लेखक म्हणतो,' गरोदरपणी तिच्या वाढलेले शरीर अपुऱ्या कपड्यात मावत नव्हते. फाटलेल्या चोळीमधून स्तन बाहेर पडले होते'[१७] या वर्णनातून चंद्रभागेच्या दैन्याची, जुगुप्सेची भावना प्रकट होताना दिसते. मैदानातील माणसे मैथून करतात, एकमेकांना आवळतात पण निसर्गापासून स्वतःचे संरक्षण करण्याकरिताच. 'तहान', 'मरण स्वस्त होत आहे' या कथेतून ही याचे प्रत्यंतर येते.

## बागुलांच्या कथेतील निसर्ग

बागूलांच्या कथेत जे निसर्गवर्णन येते ते, इतर मध्यमवर्गीय लेखकाप्रमाणे घटना, प्रसंगाची शोभा वाढविण्यासाठी येत नसून; मानवाला दुःख देणारी जी कारणे आहेत त्यामधीलच एक घटक म्हणून निसर्ग येतो. दुःखाने खचलेल्या, दारिद्र्यात राहणाऱ्या माणसाच्या जीवनावर प्रहार करण्यासाठी बागुलांच्या कथेत निसर्ग येतो. हा निसर्ग सौम्य, सुंदर, मनोवेधक, आल्हाददायक नसतो तर तो प्रलयंकारी असतो. तो निसर्ग गरीबांच्या जीवनाची दाणादाण करतो. या निसर्गामुळेच माणसातील माणुसकीचा झरा आटतो. निसर्गप्रभावाने ही माणसे पशुसारखी वागतात, आपला मूळ स्वभाव सोडून क्रूर, हिस्त्र, अत्याचारी होतात.

'भूक' आणि 'भांड्वल' या कथेत थैमान घालणाऱ्या माणसाला दुःखी करणाऱ्या पावसाचे जीवंत प्रत्ययकारी चित्रण येते. बागूल भांड्वल मधील पावसाचे चित्रण करताना लिहितात, 'अजगर ज्याप्रमाणे माणसाला जखडून मोडून काढतो तसे खाचरात येणारे पाणी समुद्राचे पिसे पिऊन प्रत्येक झोपडीला वेढा घालीत होते.'[१८] या वर्णनातून असे दिसून येते की, झोपडपट्टीच्या नरकात राहणाऱ्या माणसांच्या दुःखात भर घालणारा एक घटक म्हणूनच पाऊस येतो. पाण्याबरोबरच या झोपडपट्टीत साप आणि नु - घाण शिरत होती आणि दरिद्री माणसाच्या जीवनात दुःखात भर घालत होती.

'सक्तमजुरी'तील उन्हाचे पोळणारे वर्णन करताना बागूल लिहीतात, 'वरून दुपारचे आकाश आग ओतीत होते. खाली रस्ते धुमसत होते. झळाचे लोट नाकातोंडात शिरून अंगातील ओल शोषित होते. कोरड पाडीत होते. तहान छळत होती. पोटात कालवाकालव होत होती. पेटलेले वारे विजेचे फटके मारीत होते. अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या.'[१९] दुपारच्या उन्हाचे एवढे जिवंत चित्रण, माणसांच्या भावनासह कदाचित मराठीत कुणी केले असावे. यातून त्या कथेतील पात्रांच्या दैन्य, दारिद्र्याचा ठसा वाचकाच्या मनावर उठतो. दुःखाची भावना या उन्हाने अधिकच गडद होते.

मैदानातील माणसे मध्ये फोडून काढणाऱ्या थंडीचे थडथडायला लावणारे वर्णन केले आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी, ही माणसे भांडतात, मारामारी करतात, मैथून करतात, एकमेकांना बिलगतात. दीन दुबळी माणसे निसर्गामुळे संहारक बनतात. ऊब मिळविण्यासाठी डेव्हीड-सारख्या दादालाही क्रूर होऊन मारायला ती दुबळी माणसे भीत नाहीत.

ही निसर्गवर्णने त्यांच्या कथानकात स्वतंत्रपणे न येता कथानकातच समरसून येतात. भावपोषणासाठी निसर्गाचा उपयोग केला जातो. मैदानातील माणसांच्या क्रूर वागण्याचा आणि थंडीचा संबंध जाणवतोच. ही निसर्गवर्णने भावसूचक, वृत्तीसूचक आणि क्रियासूचक असतात.

आशयानुरूप तंत्र

बाबुराव बागूल प्रसंगात्मक स्वरूपाचे कथानक निर्माण करतात. वास्तवाचा प्रत्यय देण्यासाठी व्यक्तिचित्रणाला उठाव येण्यासाठी जेवढे आवश्यक तेवढेच प्रसंग त्यांच्या कथेत येतात. विषयानुरोधाने त्यांच्या कथेची अभिव्यक्ती होत असते.

शिरीष पै म्हणतात, 'त्यांची कथा ही मला एखाद्या चौकटीत न मावणाऱ्या आक्रमक चित्राप्रमाणे वाटते.'[२०] चौकटीत न बसणारी त्यांची कथा पूर्वील संकेत आपोआपच मोडते. त्यांना जे सांगायचे आहे ते इतके प्रचंड अस्वस्थ करणारे आहे की, त्यामुळे अशा आशयाला अभिव्यक्त करण्याला जुनी गुळगुळीत झालेली रचनातंत्रे कमी पडतात. म्हणूनच आपणाला पाहिजे तसा घाट घेत त्यांची कथा पुढे जाते. पूर आलेली नदी ज्याप्रमाणे आपल्या वाटेत येणाऱ्या सर्वांना बाजूला सारून किंवा आपल्या बरोबर घेत जाते. तिचा आवेग तिला कोणते रूप देईल हे जसे सांगता येत नाही तसे काहीसे बागुलांच्या अभिव्यक्तीचे आहे. ठराविक नजरेतून कथेकडे पाहण्याची सवय लागलेले आपण जुन्या मानदंडाने बागुलांच्या कथेकडे पाहतो; पण ते तिला कसे लागू पडणार? म्हणूनच म. द. हातकणंगलेकरांसारखे सूज्ञ समीक्षकाही एकांगी, बेभान, आकारहीन अशी विधाने बागुलांच्या कथेबाबत करतात. 'सक्तमजुरी', 'सूर्याचे सांगाती', 'मैदानातील माणसे', 'मरण स्वस्त होत आहे', 'लहान' या कथा पसरट वाटल्या तरी त्या कथात एकात्म स्वरूपाचा संस्कार करण्याची ताकद आहे. त्या कथेत येणारा अनुभवच इतका व्यापक, प्रचंड आहे की तिला पसरट होण्याशिवाय मार्गच राहत नाही. त्या कथातून अनेक कथा बीजांची स्फुलिंगे बाहेर पडलेली दिसतात. पूर्वीच्या कथेप्रमाणे सुबक, रेखीव, नाजूक शहरी सुंदरी प्रमाणे त्याची कथा नसते. त्याची कथा स्वच्छंदपणे उनाडणाऱ्या ग्रामीण तरुणीसारखी मुक्त असते. पूर्वीचे नाकारीत स्व-तंत्र निर्माण करीत त्यांची आवेगी कथा पुढे जाते. बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, 'बागुलांच्या कथा कथेच्या लोकप्रिय कल्पना उधळून लावणाऱ्या आहेत. त्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

अफाट, अस्ताव्यस्त रूपात अवतरलेल्या असतात. नेटकेपणा, सुटसुटीतपणा परिणाम साधणारा तांत्रिक कसबीपणा यांची त्या फिकीर करत नाहीत. तंत्र विचाराच्या सर्व चौकटी ते बेधडक भिरकावून देतात.... जो बहुकेंद्री, बहुपरिणामात्मक, अफाट चैतन्यशक्तीने सळसळता जीवनानुभव ते व्यक्त करु पाहतात, त्याला कथेचा स्वंबंध पुरेसा नाही, ओसंडून वाहणा-या फेसाळत्या पाण्याप्रमाणे ती कथेचे बांध सतत ओलांडत जाते आहे![20] कवठेकर समजतात तसे बागूल तंत्रविषयी बेफिकीर नाहीत. चांगल्या लेखकाच्या ठिकाणी भाषेची, रूपाची एक उपजत असल्यासारखी जाण असते. तशी ती बागुलांच्या ठिकाणीही आहे म्हणून असे म्हणावे वाटते की, त्यांच्या कथेतून एक स्व-तंत्र ते निर्माण करु पाहताहेत. उदा. १) कथेच्या सुरवातीचे वातावरण, भावना कथेच्या शेवटी एकदम विरुध्द टोकाचे झालेले असते; बदललेले असते. २) परस्पर-विरोधी भावनांचे धागे गुंफण्याच्या खेळात त्यांची कथा रंगते. त्यातून ती नाट्यमयता निर्माण करते. 'लुटालूट' मध्ये भावाला पैसे पाठविण्यास उत्सुक असलेली गंगू शेवटी निराश होते. पैसे मिळवून दोन घास सुखाने खाण्याची आकांक्षा करते तर शेवटी पैसे न मिळाल्याने निराशा पदरी घेऊन जगते.

## विषयाचे वेगळेपण

बागुलांची संवदेनशीलता ही मध्यमवर्गीयापेक्षा वेगळी असल्याने त्यांच्या कथेत येणारे विषय पारंपारिक विषयापेक्षा वेगळे आहेत. त्यांनी मराठी कथेचे विश्वविषयाच्या दृष्टीने विस्तारले आहे. लहान वयातील मुलांच्या मनातील ताणाबाणाचे 'चित्रण' आई' सक्तमजुरी' भांडवल' आणि 'शिक्षण' या कथांतून रंगविले आहे. प्रेमभावनेने झपाटलेल्या गुंड माणसाच्या मनाचे आणि सभोवतालच्या वातावरणाचे जिवंत चित्रण, स्त्रीयांनी दुर्लक्षिलेल्या गुंड माणसाकडे एक स्त्री मदत मागण्याकरिता आल्यावर तिच्यासाठी तो आपले सर्वस्व पणाला लावतो, त्याचे चित्रण, मुलांच्या प्रेमाने गि-हाईका-च्या विकृत इच्छा तृप्त करुन पैसे मिळवू पाहणारी पण पैसे घेऊन पळणा-या

गि-हाईकास थांबवून शकणा-या गिरजेचे चित्रण, फाटक्या संसाराला ठिगळे लावण्यासाठी केळी विकणा-या दोन स्त्रीयांच्या स्पर्धेचे चित्रण, मानसिक दु:खाने दुभंगलेल्या पृथ्वीभी जयच्या मनाचे आणि अंगावर रोमांच उभे करणा-या वातावरणाचे चित्रण, जातीमुळे सोसाव्या लागणा-या यातना पासून स्वत:ची सुटका करुन घेण्यासाठी जात चोरणा-या तरुणाचे चित्रण, देहविक्रय करुन पैसे मिळवणा-या स्त्रियांनाही कसे लुटले जाते त्याचे चित्रण, आईकडे वेगळ्यापण वास्तव भूमिकेने पाहण्याच्या वेगळ्या दृष्टिकोनाचे चित्रण, थंडीने माणसा-मधील पशु कसा जागा होतो• त्याचे चित्रण, सरळ मनाच्या लक्ष्मण जाधवचे गुंडामध्ये कसे परिवर्तन होते त्याचे चित्रण, मरणाची भिन्न भिन्न सुन्न करणारी रुपे, विनाकरण केल्या जाणा-या जुलूमाचे चित्रण, दारिद्र्यात स्वप्नरंजन करण्या-च्या लागलेल्या तहानेचे चित्रण, दु:खद परिस्थितीत जन्मलेली कविता हे आणि असेच इतर कथांमध्ये आलेले विषय यापूर्वी मराठी साहित्यात कधीच आले नव्हते• मराठी साहित्याला या विषयांचा प्रांत नवा होता• बागुलांनी आपल्या कथांतून या वेगळ्या विषयांचे चित्रण करुन अनुभवाचे एक नवे पण वेगळे दालन मराठी वाचकासाठी खुले केले• पांढरपेशी कल्पनासृष्टीच्या पलिकडे असलेले विषय चित्रित करुन मराठी साहित्याला बागुलांनी फार मोठी देणगी दिली आहे•

त्यांच्या कथांत अनेक गुंड, मवाली माणसे येतात• परंतु त्यांच्या गुंडपणाला कुठेतरी माणुसकीची किनार आहे, हृदयात ओलावा आहे.'मवाली' मधला कोलंबस गिरजाला सोडायला सांगतो• तर 'मैदानातील माणसे' मधील डेव्हिडदादा बाळंत होणा-या स्त्रीला मदत करु पाहतो• अशा या गुंड माणसाच्या वेगळ्या जगाच्या जीवनचित्रणाचा वेगळेपणा त्यांच्या कथातून दिसून येतो• एका भडक रंगाने रंगविलेल्या व्यक्ति, विषय त्यांच्या कथेत कधीच नसतात, ते त्यांच्या कथाविषय कधीच नसतात• हे बागुलांचे वेगळेपण आहे•

दलित लेखक म्हणून व्यापक दृष्टिकोन•

नामांतराने बहिष्कृत केलेल्या शोषितांच्या शोषणाची कथा आणि पीडितांच्या पीडनाची व्यथा बागुलांच्या कथेत येते• आर्थिक दुरवस्थेमुळे

ज्यांना शहरात राहणे अशक्य आहे, ती माणसे झोपडपट्टीच्या दिशेने प्रवास करतात. झोपडपट्टीत राहणाऱ्या दुःखी माणसांच्या जीवनात जन्मजात दलितत्वासह आर्थिक दुरवस्था, सामाजिक विषमता, मनुष्य स्वभाव आणि नियती ही कारणे त्यांच्या जीवनात दुःख निर्माण करतात याचे चित्रण बागुलांच्या कथेत येते.

दलित साहित्याकडे बागूल ह्या विशाल मानवतावादी भूमिकेतून पाहात असल्यामुळे फक्त दलितांच्या जोडीनेच इतर शोषितांचे, पीडितांचे त्यांच्या प्रश्नांचे, दुःखाचे चित्रण ते आपल्या कथांतून करतात. बागूल आपल्या स्वगतामध्ये म्हणतात, 'येथे मी जन्म घेतला म्हणून जात मिळाली पण जेव्हा मी लिहू लागलो, माणसांचा विचार करू लागलो तेव्हाच मी देशातल्या आणि जगातल्या सर्व दलित, उपेक्षित वंचितांचा झालो. मी तशा कथा लिहिल्या. मुसलमान, ख्रिस्ती, निग्रो हे माझे कथाविषय झाले.'[२२] लेखक म्हणून बागुलांची भूमिका व्यापक आहे, मानवतावादी आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या कथातून विविध जाती धर्माच्या माणसांना कथा-विषय केले. बागुल म्हणतात,' आपल्या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो एशियाई देशातील काळा, गोरा, पिवळा येतो. आपल्या देशातील अस्पृश्य; आदिवासी, शोषित, पीडित येतात.'[२३]

बागुलांच्या उपरोक्त विचारप्रणालीचे दर्शन त्यांच्या कथाविश्वातून आपणास घडते.

विविध जाती-धर्मांची माणसे.

दलितासह विविध जाती, धर्मातील शोषित, पीडित माणसांचे दुःख दर्शन ते घडवितात.

त्यांच्या कथेत 'सक्तमजुरी' तील फर्नांडिस, 'मैदानातील माणसे' मधील डेव्हिड, 'जुलूम' मधील फ्रेडरिक, 'एलिझा ही पात्रे ख्रिश्चन आहेत.

'सक्तमजुरी'तील मोहम्मदअल्ली' मैदानातील माणसे'मधील अब्दुल करीम या मुस्लीम पात्राचे दुःखी जीवन बागूल चित्रित करतात.

'मरण स्वस्त होत आहे' मधील भिमू कदम, 'स्पर्धा' मधील जमना म्हातारी आणि चंद्रा ही पात्रे मराठा समाजातून या कथासागरात येतात.

'सूर्याचे सांगाती' तील मधील संजय कुलकर्णी ब्राम्हण असला तरी दलित चळवळीत पडलेला, दु:खाने होरपळलेला आहे·

'विद्रोह' मध्ये भानी, जय, शांती यांच्या सहाय्याने भय्यांच्या व्यथा-वेदना व्यक्त करतात· 'नक्तमजुरीत' सिकंदर सिंधी,' मैदानीतील माणसे' मध्ये मद्रासकडील महारोगी, फासेपारधी जमातीतील अजा आजी, सोना, 'मरण स्वस्त होत आहे' मध्ये मद्राशी मणीवाली, कच्छकडील झाडूवाली, 'मवालीत' गोव्याची गिरिजा, 'गुंड' मध्येल आफ्रिकेतील इथोपियन गुजराथी जयंतीबेन ही सर्व पात्रे आपआपली दु:खे घेऊन येतात व बागुलांच्या कथांचा आशय समृध्द करतात· जन्माने दलित असणा-या अनेक पात्रांचे जीवन त्यांच्या कथा ढवळून काढतात·

बागुलांच्या कथेत येणा-या माणसांच्या दु:खाचे मूळ कारण आर्थिक विषमता हे आहे· म्हणून झोपडपट्टीत राहणारी ही माणसे पोटाची खळगी भरण्यासाठी वाट्टेल तो धंदा, व्यवसाय करतात· वेळ प्रसंगी वाममार्गाचाही अवलंब करतात·

'लुटालूट' मधील वंचाळा, पुतळी, सोनी,' मरण स्वस्त होत आहे' मधील मणीवाली, झाडूवाली, 'भांडवल' मधली गुणा, 'वाटेवरची' 'मवाली' मधली गिरजा, पैसे मिळविण्यासाठी वेश्या व्यवसाय करतात·

तोराप्पा, डेव्हिडदादा, लक्ष्मण जाधव, कोलंबस, काशीनाथ, रफायल, पिटर, मायकेल, इथोपिअन दादा ही माणसे जगण्यासाठी गुंडगिरीचा आश्रय घेतात·

फर्नांडिस, डॅनिअल, संभा, सिकंदर, कैतान, कासमअल्ली हे आपल्या दरिद्री कुटूंबाच्या गरजा भागविण्यासाठी तीन पानी जुगार खेळतात· बुवा, बारकू, पुंजा महाराज, भीक मागून जीवनाची गुजराण करतात· रामू कागद विकून पोट भरतो, चाचा हिशेब लिहून, नातावाला भीक मागायला लावून जगतो· फ्रेडरिक सुतारकाम करून आपल्या संसाराला हातभार लावतो· डॉ· बापू, नारायण रेड्डीची औषधे गाड्यावरून विकतो, मल्लाप्पासारख्या दारूभट्टीकाढून पैसे मिळवितो, तर मास्तर त्यांच्या मुलांना शिकवून, जमुना म्हातारी आणि चंद्रा केळी विकून आपल्या फाटक्या संसाराला ठीगळे

लावीत असतात. ज्याला दारिद्र्यामुळे भंग्यांची नोकरी करावी लागते.

जीवनातील हालाखी संपविण्यासाठी, वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठी ही माणसे अहोरात्र झगडत असतात. त्यासाठी कोणत्याही मार्गाला जातात, वाटेल तो व्यवसाय करतात.

जीवनावर श्रद्धा
------------

बाबुराव बागुलांच्या कथांचे परिशीलन केल्यावर त्यांचा मार्क्सवादाकडे कल असल्याचे दिसून येते. मार्क्सवादी विचारसरणीच्या पाऊल खुणा त्यांच्या कथातून दिसून येतात. आणि मार्क्सवादी मनुष्य उज्ज्वल भविष्यावर विश्वास ठेवीत असतो. याचे प्रत्यंतर त्यांच्या कथांतून पाहावयास मिळते. 'कवितेचा जन्म' या कथेत विदारक विषण्ण वातावरणाने व्यथित झालेला संवेदनाशील कवी निराश होत नाही. या अशाही वातावरणात नवसृजनाचे कार्य तो करीत असतो हे विशेष. जीवनावरील असीम श्रद्धेमुळेच तो काव्यनिर्मिती करतो. 'सूर्याचे सांगाती' मधील माणसे वेदनेचे विष पिऊनही जीवनाच्या संजीवन अमृताकडे धाव घेत असतात. विषमतेने दुःखी झालेला नाखवा, बायकोने आणि समाजाने दुःख दिलेला संजय कुलकर्णी, परिस्थितीच्या रेट्याने अंतःकरणाचा भडका उडालेला श्रीधर सावंत, क्रांतीकार्यासाठी आपल्या संसाराची धूळधाण करणारा चाचा ही सर्व माणसे खचलेली आहेत, दुःखी आहेत. परंतु निराश नाहीत. त्यांची जीवनावर श्रद्धा आहे. आज वेदनेच्या वणव्यात होरपळत असलो तरी भविष्यकाळ निश्चित उज्ज्वल आहे हे त्यांना मान्य आहे म्हणून सावंतने 'काळोख फार आहे .... फार आहे असे म्हणताच आणि सूर्याचे सांगातीही आहेत'[२४] असे म्हणून आपला आशावादी, सश्रद्ध जीवनाचा दृष्टिकोन स्पष्ट करतो.

भयाण वास्तवामुळे दुःख वाट्याला आले तरीही बागुलांची पात्रे त्या दुःखाने उन्मळून पडत नाहीत. कोणत्याही बिकट खडतर परिस्थितीत त्यांची जीवनावरील श्रद्धा कमी होत नाही. म्हणूनच त्यांची पात्रे प्रतिकूल

परिस्थितीही जीवनाचा लढा जिंकण्यासाठी संग्राम करीत असतातात. जीवनावरील या श्रद्धेमुळेच निराश होऊन खचून न जाता मानवतेची पूजा करतात; भविष्यकालीन जीवनाकडे आशेने पाहतात. या काळोखाने भरलेल्या जीवनात कधीतरी सूर्याचा प्रकाश येईलच ही त्यांची श्रद्धा आहे. थंडीच्या तडाख्याने माणसे क्रूर होतात ती जीव जगविण्यासाठीच, अनंत हालअपेष्ठा सहन करुनही भिमू कदम, राणू नागवेकर, बारकू जगत असतात. मेहुण्याचा खून करणारा लक्ष्मण आपल्याला त्याचा खून करायचा नव्हता, त्याच्या वर्तनानेच तो मेला असे समजतो. यातूनही जीवनावर असणारी त्याची श्रद्धा दिसून येते. रक्त विकून पोट भरणारा अब्दुल करीमही जीवन जगण्यासाठी धडपड करीत असतो.

बागुलांच्या कथाविश्वातील बहुतेक सर्व पात्रे जीवनावरील या श्रद्धे-मुळे, जीवन जगण्याच्या लालसेमुळेच सतत काहीना काही धडपडत करीत असतात.

जन्मजात दलितात्वाचे अथवा अस्पृश्यतेचे चित्रण बागूल यांनी कसे केले आहे ते मागील प्रकरणात पाहिले. जन्मजात अस्पृश्यतेमुळे दलित बनलेल्या लोकांच्या जोडीनेच, ते सुसंस्कृत नगराने बाहेर लोटलेल्या व आर्थिक शोषणाचे बळी बनल्यामुळे दलित झालेल्या वर्गाचाही समावेश आपल्या दलितविषयक संकल्पनेमध्ये करतात. आर्थिक दृष्टया शोषित असल्याने व कमालीच्या दरिद्री लोकांचे म्हणजे झोपडपट्टीत राहणाऱ्या स्त्री-पुरुषाचे चित्रण त्यांनी अनेक कथांतून कसे केले आहे याचे विवेचन आपण प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

ह्या जीवनातील दु:ख जन्मजात अस्पृश्यतेने निर्माण केलेले नाही तर आर्थिक शोषणामुळे ते निर्माण झालेले आहे. आर्थिक शोषणाच्या जोडीलाच ह्या झोपडपट्टीतील समाजातील लोकच इतरावर कसा अन्याय करतात व काही प्रमाणात नियतीही त्यांच्या जीवनात दु:ख कशी निर्माण करते. हे आपण बघितले. हे जीवनच इतके भयंकर आहे की सगळेजण पोटाच्या आणि इंद्रियाच्या भूकेने व्याकूळ झालेले दिसतात. बाबुराव बागूल ह्या झोपडपट्टी-तील जीवन, आतून बाहेरुन व व्यापक मानवतावादी भूमिकेतून चित्रित करतात. ह्या विदारक आशयाचे प्रकटन करण्यासाठी अनुरुप अशाच तंत्राचा ते स्वाभा-विकपणे उपयोग करतात. दलित लेखक म्हणून असलेली त्यांची भूमिका

व्यापक बनल्याने अस्पृश्याशिवाय इतर जाती, धर्म, वंश, भाषा, प्रदेश यातील लोकांचेही चित्रण ते स्वाभाविकपणे करतात. दलितत्व हे केवळ अस्पृश्यतेशी निगडीत नाही. जन्मजात दलितत्वाचा समावेश करून ते दलित लेखक म्हणून व्यापक भूमिका घेतात हे वरील विवेचनावरून दिसून येते.

## संदर्भ


१· बाबुराव बागूल — 'विद्रोह', जेव्हा मी जात चोरली होती, २ री आ·, मुंबई, अभिनव प्रकाशन, एप्रिल, १९७६ पृ·९१

२· ———— — तत्रैव पृ·१०२

३· बाबुराव बागूल — पूर्वोक्त, पृ·१२५

४· नरेश कवडी, — मरण स्वस्त होत आहे : काही विचार, सत्यकथा, ( मे·१९८१)पृ·१७

५· बाळकृष्ण कवठेकर — दलित साहित्य: एक आकलन, १ ली आ·, कोल्हापूर, अजब पुस्तकालय, जाने, १९८१, पृ·५९

६· म·द· हातकणंगलेकर — मरण आणि वेलबुट्टी, समाज प्रबोधन पत्रिका, ( नो-डि·१९७० )

७· शंकर सारडा — काही पुस्तके:काही लेखक , १ ली आ, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, ऑगस्ट १९६५, पृ· १४४

८· बाबुराव बागूल — 'लुटालूट' मरण स्वस्त होत आहे, १ ली आ·, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६९, पृ·१

९· बाबुराव बागूल — 'मैदानातील माणसे,' पूर्वोक्त, पृ·४८

१०· भालचंद्र फडके — दलित साहित्य: वेदना व विद्रोह, १ ली आ·, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, डिसें·१९७७ पृ· १९७


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| | | |
|---|---|---|
| ११· | ———— | तत्रैव पृ· १९८ |
| १२· | बाळकृष्ण कवठेकर | पूर्वोक्त पृ·५६ |
| १३· | बाबुराव बागूल | पूर्वोक्त पृ·१२५ |
| १४· | बाळकृष्ण कवठेकर | पूर्वोक्त पृ·५७ |
| १५· | विजये सोनवणे | दलित साहित्य का नको ?, १ ली आ·, मुंबई, महाराष्ट्र बौध्द साहित्य परिषद, एप्रिल १९७९, पृ·३०-३२ |
| १६· | बाबुराव बागूल | 'वाटेवरची', पूर्वोक्त, पृ·४८ |
| १७· | बाबुराव बागूल | 'अराजक' मरण स्वस्त होत आहे, १ ली आ,· मुंबई, बाल पाठक प्रकाशन प्रेस· १९६९, पृ· ५५ |
| १८· | बाबुराव बागूल | 'भांडवल' तत्रैव पृ·२२ |
| १९· | बाबुराव बागूल | 'सक्तमजुरी', तत्रैव, पृ·१४ |
| २०· | शिरीष पै | प्रस्ता·जेव्हा मी जात चोरली होती, पृ·५ |
| २१· | बाळकृष्ण कवठेकर | पूर्वोक्त, पृ·६२ |
| २२· | बाबुराव बागूल | 'स्वगत', पूर्वोक्त, पृ·१५१ |
| २३· | बाबुराव बागूल | 'दलित म्हणजे' हे जग आणि जीवन नव्याने मांडणारा', दलित साहित्य: आजचे क्रांति-विज्ञान, नागपूर, बुध्दिष्ट पब्लिशिंग हाऊस ऑगष्ट, १९८१, पृ·२७१ |
| २४· | बाबुराव बागुल | 'सूर्याचे सांगाती', पूर्वोक्त पृ· ८८ |